सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १६१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


**सुट्टीची सूचना**

शुक्रवार दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजी अनंत चतुर्थी निमित्त दै. सोलापूर तरूण भारत कार्यालयास सुट्टी आहे. त्यामुळे शनिवार दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही याची वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

- व्यवस्थापक

## थेट कर भरण्याची सुविधा उपलब्ध

**पुणे :** ने सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस (सीबीडीटी) कर संकलनासाठी आपल्या पेमेंट गेटवेचे इंटीग्रेशन पूर्ण केले आहे. यामुळे देशभरातील करदात्यांना विविध डिजिटल तसेच प्रत्यक्ष माध्यमांद्वारे प्रत्यक्ष कर भरण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.प्रत्यक्ष कर भरण्याची प्रक्रिया अधिक सोपी आणि सुविधाजनक करण्यासाठी करदाते यूपीआय, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड तसेच आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या रिटेल आणि कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग प्लॅटफॉर्मसह विविध पेमेंट पर्यायांचा वापर करू शकतात. ऑफलाइन पद्धतीने कर भरण्यास प्राधान्य देणारे करदाते आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या कोणत्याही शाखेला भेट देऊन चेक, डिमांड ड्राफ्ट किंवा रोख रकमेच्या माध्यमातून कर भरू शकतात. याशिवाय, इतर बँकांचे ग्राहकही आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या पेमेंट गेटवेद्वारे त्यांच्या संबंधित बँकांच्या इंटरनेट बँकिंग सुविधेचा वापर करून प्रत्यक्ष कराचा भरणा सहजपणे करू शकतात.

## नांदेडमध्ये नवीन शाखा सुरु

**नांदेड :** आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड ("एबीएचएफएल") या आघाडीच्या हाऊसिंग फायनान्स कंपनी आणि आदित्य बिर्ला कॅपिटल लिमिटेडच्या उपकंपनीने महाराष्ट्रातील आपला विस्तार वाढवत नांदेडमध्ये नवीन शाखा सुरू केली आहे. देशभरातील वितरण नेटवर्क वाढवण्याच्या कंपनीच्या व्यापक योजनेचा हा एक भाग आहे. या नवीन शाखेमुळे महाराष्ट्रातील एबीएचएफएलच्या शाखांची एकूण संख्या 43 झाली आहे.

## 2,000 बेडच्या अदाणी आरोग्य मंदिराची पायाभरणी

**कोलकाता:** पश्चिम बंगालचे माननीय मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी आज कोलकाता येथील न्यू टाउनमधील बंगाल सिलिकॉन व्हॅली टेक हब येथे 2,000 बेड च्या अदाणी आरोग्य मंदिराची पायाभरणी केली. पश्चिम बंगालच्या 2026 च्या आरोग्यसेवा दृष्टिकोनाशी सुसंगत असलेला हा प्रकल्प अदाणी फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणार असून,या प्रकल्पाच्या माध्यमातून दरवर्षी 2 लाखांहून अधिक इनपेशंट्स आणि 20 लाखांहून अधिक आऊटपेशंट्सना सेवा मिळणार असून सुमारे 10,000 रोजगार निर्माण होणार आहेत. पूर्व भारत आणि त्यापलीकडील भागांसाठी जागतिक दर्जाचे अकादमिक मेडिकल सेंटर आणि सर्वसमावेशक आरोग्यसेवा परिसंस्था म्हणून या प्रकल्पाची संकल्पना करण्यात आली असून, यासाठी 4,000 कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्यात येणार आहे.

# पतीची प्रेयसी 'नातेवाईक' ठरू शकत नाही; उच्च न्यायालयाकडून महिला प्रेयसीविरोधातील गुन्हा रद्द!

## कर्नाटक उच्च न्यायालयाचा मोठा निकाल!

**बेंगळुरू :** पतीच्या प्रेयसीकडून पत्नीचा मानसिक किंवा शारीरिक छळ झाला, तरी तिच्यावर भारतीय न्याय संहितेअंतर्गत (BNS) क्रूरतेचा किंवा छळाचा गुन्हा दाखल करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल कर्नाटक उच्च न्यायालयाने दिला आहे. विवाहित पुरुषाची प्रेयसी ही त्याची 'नातेवाईक' ठरू शकत नाही, असे स्पष्ट करत उच्च न्यायालयाने संबंधित महिला प्रेयसी विरोधातील गुन्हेगारी कारवाई पूर्णपणे रद्द केली आहे.

काय आहे नेमके प्रकरण ?

एका विवाहित पुरुषाच्या प्रेयसीने तिच्याविरुद्ध कनिष्ठ न्यायालयात सुरू असलेल्या गुन्हेगारी खटल्याविरोधात कर्नाटक उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. पीडित पत्नीने नोंदवलेल्या तक्रारीत पतीच्या प्रेयसीवर छळ करणे, मारहाण किंवा गुन्हेगारी बळाचा वापर करणे, धमकी देणे आणि अपमान करणे असे विविध गंभीर आरोप लावले होते. याशिवाय, तिच्यावर हुंडा बंदी कायद्यांतर्गत हुंड्याची मागणी केल्याचाही आरोप करण्यात आला होता.

भारतीय न्याय संहितेतील कलम ८५ काय सांगते ?

भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ चे कलम ८५ हे एखाद्या महिलेचा तिच्या पतीकडून किंवा पतीच्या नातेवाईकांकडून होणाऱ्या क्रूरतेविरोधात व छळाविरोधात कारवाई करते. या गुन्ह्यासाठी आरोपीला तीन वर्षांपर्यंतचा कारावास आणि दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. मात्र, न्यायालयाने स्पष्ट केले की, या कलमातील कायदेशीर व्याख्या ही केवळ 'पती किंवा त्याचे नातेवाईक' यांच्यापुरतीच मर्यादित आहे, त्यामुळे प्रेयसीचा समावेश नातेवाईकांमध्ये होऊ शकत नाही.

उच्च न्यायालयाचा महत्त्वाचा युक्तिवाद

या प्रकरणावर सुनावणी करताना न्यायमूर्ती एम. नागाप्रसन्ना यांच्या खंडपीठाने सर्वोच्च न्यायालयाच्या एका जुन्या ऐतिहासिक निर्णयाचा संदर्भ दिला. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच स्पष्ट केले आहे की, विवाहित पुरुषासोबत संबंध असलेली स्त्री किंवा त्याची प्रेयसी ही त्याची कायदेशीर नातेवाईक मानली जाऊ शकत नाही. न्यायालयाने आपल्या आदेशात नमूद केले की, "सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या कायदेशीर चौकटीनुसार, प्रस्तुत प्रकरणातील मुख्य आरोपी पुरुषाची प्रेयसी ही त्याची नातेवाईक ठरू शकत नाही. त्यामुळे तिच्यावर कलम ८५ अंतर्गत क्रूरतेचा किंवा छळाचा गुन्हा लागूच होऊ शकत नाही."

हुंडा छळाच्या आरोपांवर न्यायालयाचे स्पष्टीकरण

न्यायालयाने पुढे स्पष्ट केले की, पूर्वीच्या भारतीय दंड संहितेच्या (IPC) कलम ४९८-अ किंवा नवीन BNS च्या कलम ८५ अंतर्गत गुन्हा सिद्ध करण्यासाठी, तो छळ पती किंवा त्याच्या नातेवाईकांकडून हुंड्याची मागणी पूर्ण न झाल्यामुळे झालेला असावा लागतो.

# शाळांजवळ जंक फूडच्या विक्रीवर कडक नियम, FSSAIचा नवा मसुदा

शाळांमध्ये आणि शाळांच्या 50 मीटर परिसरात जास्त मीठ, साखर आणि फॅट असलेल्या खाद्यपदार्थांच्या विक्रीवर निर्बंध घालण्याच्या नियमांना आता अधिक स्पष्टता मिळण्याची शक्यता आहे. गेल्या काही वर्षांपासून याबाबत नियम अस्तित्वात असले तरी नेमके कोणते खाद्यपदार्थ या नियमांच्या कक्षेत येतील, याबाबत स्पष्ट यादी उपलब्ध नव्हती. आता भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण म्हणजेच FSSAIने यासंदर्भातील नवीन नियमांचा मसुदा प्रसिद्ध केला आहे.

नव्या मसुद्यानुसार, एखादा खाद्यपदार्थ शाळांच्या परिसरात विक्रीसाठी योग्य आहे की नाही, हे त्यातील मीठ, साखर आणि फॅटच्या प्रमाणाच्या आधारे ठरवले जाणार आहे. त्यामुळे चिप्स, बिस्किटे, पॅकेज्ड स्नॅक्स किंवा शीतपेयांसारख्या पदार्थांवर सध्या थेट बंदी घालण्यात आलेली नाही. संबंधित खाद्यपदार्थांमध्ये पोषक घटकांचे प्रमाण किती आहे, यानुसार त्यांच्यावर निर्बंध लागू होण्याची शक्यता आहे.

सध्याच्या नियमांनुसार शाळेच्या कॅन्टीन, मेस, वसतिगृह तसेच शाळेच्या प्रवेशद्वारापासून 50 मीटरच्या परिसरात जास्त मीठ, साखर आणि फॅट असलेल्या पदार्थांच्या विक्रीवर निर्बंध आहेत. याशिवाय मुलांना आकर्षित करणाऱ्या अशा खाद्यपदार्थांच्या जाहिरातींवरही नियम लागू आहेत.FSSAIच्या माहितीनुसार, शाळांसाठी आरोग्यदायी खाद्यपदार्थांची यादी किंवा अनिवार्य मेनू अद्याप अंतिम करण्यात आलेला नाही. नवीन पोषणविषयक मसुदा अंतिम झाल्यानंतर कोणते पदार्थ प्रतिबंधित किंवा नियंत्रित केले जातील, हे स्पष्ट होणार आहे. नियम अंतिम झाल्यानंतर शाळेतील कर्मचाऱ्यांना याबाबत प्रशिक्षण आणि मार्गदर्शन दिले जाणार आहे. 'ईट राईट स्कूल' हा उपक्रम सध्या शाळांसाठी ऐच्छिक आहे. तसेच 50 मीटरच्या नियमाची अंमलबजावणी आणि त्यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी संबंधित राज्य सरकारांची असेल. दरम्यान, हे नियम पूर्णपणे कधी लागू होतील, याची अंतिम मुदत अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही. त्यामुळे FSSAIचा अंतिम निर्णय आणि त्यानंतर जाहीर होणाऱ्या खाद्यपदार्थांच्या यादीकडे पालक, विद्यार्थी आणि शाळांचे लक्ष लागले आहे.

## ग्रेटर नोएडामध्ये स्लीपर बसला भीषण आग; 9 प्रवाशांचा होरपळून मृत्यू

**ग्रेटर नोएडा :** ग्रेटर नोएडामध्ये यमुना एक्स्प्रेसवेवर स्लीपर बसला भीषण आग लागून 9 प्रवाशांचा मृत्यू झाला. बुधवारी रात्री जेवर परिसरातील दयानतपूर गावाजवळ ही घटना घडली. बिहार पासिंगची ही बस नोएडाहून महोबाकडे जात होती. अपघाताच्या वेळी बसमध्ये सुमारे 35 प्रवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

गाढ झोपेत असताना बसला अचानक लागली आग

पोलिसांच्या माहितीनुसार, रात्री 11 वाजण्याच्या सुमारास बसला अचानक आग लागली. यमुना एक्स्प्रेसवेवर बस पोहोचल्यानंतर काही प्रवाशांना जळल्यासारखा वास आला. त्यांनी चालकाला बस थांबवण्यास सांगितले. मात्र, बस थांबवण्यापूर्वीच आगीने मोठे रूप घेतले आणि काही वेळातच संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.

आगीमुळे बसमध्ये मोठ्या प्रमाणात धूर पसरला. त्यामुळे प्रवाशांमध्ये घबराट निर्माण झाली. काही प्रवाशांनी खिडक्या आणि दरवाजातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. मात्र, 9 प्रवाशांना बसमधून बाहेर पडता आले नाही. त्यात एका महिलेचाही समावेश आहे. या घटनेत त्यांचा होरपळून मृत्यू झाला.

## महाविद्यालयात पदवीदान सोहळा उत्साहात ; वैष्णवी चव्हाणचा मान्यवरांच्या हस्ते गौरव

**फुलंब्री ( प्रतिनिधी ) :** फुलंब्री तालुक्यातील निधोना येथील प्रभात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १९ सप्टेंबर रोजी पदवीदान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवीधर विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली.राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत चौथा क्रमांक मिळविल्याबद्दल कु. वैष्णवी संजय चव्हाण हिचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मित्र साधना शिक्षण प्रसारक मंडळ, पाथ्रीचे अध्यक्ष द्वारकाभाऊ पाथ्रीकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. एस. एस. खाडे उपस्थित होते. संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र पाथ्रीकर, संचालक तथा सहसचिव वरुणभाऊ पाथ्रीकर, जिल्हा परिषद सदस्य गीतांजलीताई वरुण पाथ्रीकर आणि प्राचार्य डॉ. बळीराम लहाने यांची प्रमुख उपस्थिती होती.



दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्राचार्य डॉ. लहाने यांनी प्रास्ताविकातून महाविद्यालयाची शैक्षणिक वाटचाल व विविध उपक्रमांचा आढावा घेतला. यावेळी महाविद्यालयाच्या वार्षिक अंकाचे प्रकाशन करण्यात आले. महाविद्यालयातील गुणवंत तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. पोलिस दलात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत चौथा क्रमांक मिळविल्याबद्दल कु. वैष्णवी संजय चव्हाण हिचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल गीतांजलीताई वरुण पाथ्रीकर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

मार्गदर्शन करताना डॉ. एस. एस. खाडे यांनी पदवी ही शिक्षणाची सांगता नसून नव्या जबाबदारीची सुरुवात असल्याचे सांगितले. मिळविलेल्या ज्ञानाचा व कौशल्यांचा उपयोग समाजाच्या विकासासाठी करावा, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात द्वारकाभाऊ पाथ्रीकर यांनी विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणा, शिस्त व मेहनतीच्या जोरावर कर्तृत्व सिद्ध करून प्रभात महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे, असे सांगितले.

सूत्रसंचालन प्रा. शरद सोनवणे यांनी केले. डॉ. संजय जाधव यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी, पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नुकसानग्रस्त सोयाबीन पिकाची कृषिमंत्र्यांकडून पाहणी

## शेतकऱ्यांना शासनाकडून सर्वतोपरी मदतीची ग्वाही; पीक विम्याच्या अडचणी तातडीने सोडविण्याचे निर्देश

**अहिल्यानगर :** दुष्काळसदृश परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या सोयाबीन पिकाची कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी गुरुवारी संगमनेर तालुक्यातील पिंपळे येथे प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन पाहणी केली. शेतकऱ्यांना उभारी देण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ, पीक विमा तसेच कर्जमुक्ती योजनांचा लाभ प्राधान्याने मिळवून देण्यात येईल. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.



शेतकरी सोपान चकोर यांच्या शेतावर जाऊन कृषिमंत्री भरणे यांनी सोयाबीन पिकाची पाहणी केली. पावसाच्या खंडामुळे पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

यावेळी संगमनेरचे आमदार अमोल खताळ, राज्याचे कृषी आयुक्त सुरज मांढरे, जिल्हाधिकारी पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, कृषी संचालक विनयकुमार आवटे, विभागीय कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजूरकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, संगमनेरचे तहसीलदार धीरज मांजरे, तालुका कृषी अधिकारी श्रीमती बोडखे यांच्यासह महावितरण, ग्रामविकास व महसूल विभागाचे अधिकारी तसेच पिंपळे गावातील शेतकरी उपस्थित होते.

पीक विम्याच्या अडचणी तातडीने सोडविण्याचे निर्देश

पिंपळे गावातील काही शेतकऱ्यांनी पीक विमा मिळताना येणाऱ्या अडचणी कृषिमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. त्याची तातडीने दखल घेत कृषी व महसूल विभागाने चालू खरीप हंगामात याबाबत आवश्यक कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश भरणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले असून, अशा कठीण प्रसंगी प्रशासनाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शासकीय योजनांचा लाभ पोहोचवावा, असेही त्यांनी सांगितले. शेती, पशुपालन, चारा आणि पाणीटंचाईच्या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचनाही त्यांनी प्रशासनाला दिल्या.

केंद्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाअंतर्गत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठीची परिपूर्ण अधिसूचना शासन स्तरावरून लवकरच निर्गमित केली जाणार असल्याचे कृषिमंत्री भरणे यांनी सांगितले.

# गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर ५०४ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

## अहिल्यानगर शहर उपविभागात 71 अधिकारी, 669 पोलीस अंमलदारांसह बंदोबस्त

**अहिल्यानगर :** श्रीगणेशोत्सव-२०२६ शांततेत व सुव्यवस्थेत पार पाडण्यासाठी अहिल्यानगर शहर उपविभाग पोलिसांकडून व्यापक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर शहर उपविभागाच्या हद्दीत एकूण ५०४ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. यामध्ये शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी ४०९ जणांकडून बंधपत्र घेण्यात आले, तर दारूविक्री करणाऱ्या २१ जणांवर बॉण्डची कारवाई करण्यात आली. तसेच पाच जणांना जिल्ह्यातून हद्दपार करण्याची प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समिती, मोहल्ला समिती, जातीय सलोखा समिती, धर्मगुरू, गणेश मंडळे, वाद्यधारक, मूर्तिकार तसेच इतर संबंधित घटक आणि फ्लेक्स तयार करणाऱ्यांच्या एकूण ६३ बैठका घेण्यात आल्या आहेत. शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांकडून कॉम्बिंग ऑपरेशन, दंगाकाबू योजना, रूट मार्च आणि मॉब ड्रिल घेण्यात आली आहे. तसेच शहरातील परिस्थितीवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून देखरेख ठेवण्यात येणार आहे. दरम्यान, १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत गणेश मंडळांच्या विसर्जन मिरवणुका, गणेशमूर्ती विसर्जनस्थळे, मिश्र लोकवस्ती तसेच संवेदनशील आणि अतिसंवेदनशील भागांमध्ये मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. यामध्ये ७१ अधिकारी, ६६९ पोलीस अंमलदार, १३५ होमगार्ड, दोन आरसीपी प्लाटून आणि दोन एसआरपी प्लाटून यांचा समावेश आहे.

# नाईक परिवाराने कौटुंबिक संस्कारांना सामाजिक आशय देत समाजकार्याची परंपरा जपली : स्वामी गोविंददेव गिरी महाराज

## 'समन्वय महर्षी बाळासाहेब नाईक' आणि 'स्थितप्रज्ञ' ग्रंथांचे तापडिया नाट्य मंदिरात प्रकाशन

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** कै. बाळकृष्ण नाईक यांचे जीवन समाजासाठी समर्पित होते. त्यांनी आपल्या कार्यातून अनेक व्यक्तींना जोडले, कार्यकर्ते घडविले आणि समाजजीवनात समन्वयाची भावना दृढ केली. त्यांच्या कार्याचे स्मरण म्हणजे त्यांच्या सेवाभावी वाटेवर पुढे जाण्याची प्रेरणा घेणे होय. नाईक परिवाराने आपल्या कौटुंबिक संस्कारांना सामाजिक आशय देत समाजकार्याची परंपरा जपली, ही विशेष उल्लेखनीय बाब आहे, असे प्रतिपादन पूज्य स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी केले.






विश्व हिंदू परिषद आणि निर्मलोत्तम सेवा न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने तापडिया नाट्य मंदिर येथे २० सप्टेंबर रोजी आयोजित 'समन्वय महर्षी बाळासाहेब नाईक' आणि 'स्थितप्रज्ञ' या दोन ग्रंथांच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते.

स्वामी गोविंददेव गिरी महाराज म्हणाले की, बाळासाहेब नाईक यांच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहण्याचा योग आला, हे आपले भाग्य आहे. यावेळी ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ७५ प्रचारकांचे पूजन करण्याची संधी मिळाली.

राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी बाळासाहेब नाईक यांच्या प्रचारकी जीवनातील आठवणी सांगितल्या. संघाचे प्रचारक जीवन अत्यंत खडतर असते. उच्चशिक्षित असूनही घरदार सोडून संघटन उभारणीसाठी पूर्णवेळ कार्य करणाऱ्या प्रचारकांमध्ये बाळकृष्ण नाईक यांचा समावेश होता. अमेरिकेतून अभियांत्रिकीची पदव्युत्तर पदवी घेतलेले आणि सुवर्णपदक विजेते असलेले नाईक अत्यंत नम्र, मृदूभाषी व निरहंकारी होते. १९६६ मध्ये त्यांनी प्रचारक म्हणून कार्याला सुरुवात केली. एकदा पायी प्रवास करताना रस्ता चुकल्याने जंगलात रात्री झाडाखाली मुक्काम करण्याची वेळ त्यांच्यावर आली होती, अशी आठवण बागडे यांनी सांगितली.

दम्याचा त्रास असतानाही नाईक यांनी कार्यात खंड पडू दिला नाही. कुटुंबीयांनी छत्रपती संभाजीनगरला केंद्र करून तेथून प्रवासाची व्यवस्था करण्याची विनंती केली होती; मात्र त्यांनी प्रचारकी कार्याला प्राधान्य दिले, असेही बागडे यांनी नमूद केले.

स्वामी विज्ञानानंद यांनी बाळकृष्ण नाईक यांच्या पश्चिम बंगालमधील २१ वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला. आयआयटी खरगपूरजवळील गोपाळी आश्रमाच्या निर्मितीत त्यांचा महत्त्वाचा सहभाग असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच भदंत ज्ञान जगतजी महाराज महाथेरो यांच्यासोबत २४ बौद्ध देशांच्या यात्रेद्वारे हिंदू-बौद्ध समन्वयासाठी त्यांनी केलेल्या कार्याचाही उल्लेख केला. कार्यक्रमाच्या प्रारंभी निर्मलोत्तम सेवा न्यास व समन्वय मंचच्या कार्याची ध्वनिचित्रफीत दाखविण्यात आली. यानंतर भैय्याजी जोशी, विनायकराव देशपांडे, जगन्नाथ साही, कुसुमताई भट आणि अशोक वोरा यांचे संदेश दाखविण्यात आले.

कै. बाळकृष्ण नाईक यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. सुधांशुकुमार पात्रा, ॲड. प्रमोद मिठा, साध्वी विजया देवी, ॲड. हितेश कुमार जैन, अशोक वोरा, कृष्णा दामोदर उपाख्य दादा जोशी आणि कुसुमताई भट यांचा सत्कार करण्यात आला. भारत माता व कै. बाळकृष्ण नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन झाल्यानंतर मेधा शामराव नाईक यांनी प्रास्ताविक केले. दिलीप कस्तुरे यांनी दोन्ही ग्रंथांचा परिचय करून दिल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. अखिल भारतीय सह सत्संग प्रमुख दादा वेदक आणि हिंदुस्थान प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष पद्मश्री रमेश पतंगे यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजीव जहागीरदार व दिलीप कस्तुरे यांनी केले. पंडित विश्वनाथ दाशरथे यांनी समन्वय गीत सादर केले, तर डॉ. प्रदीप जबदे यांनी आभार मानले. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ देवगिरी प्रांताचे संघचालक अनिल भालेराव, नामदार अतुल सावे, विश्व हिंदू परिषदेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नाईक परिवारातील सदस्य आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे शनिवार रोजी अक्षय महाराज पिंगळे यांचे कीर्तन



**बीड (प्रतिनिधी):-** विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या 29 व्या वर्षातील पहिल्या पुण्यतिथी भाद्रपद शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. अक्षय महाराज पिंगळे बीड यांचे शनिवार दिनांक 26 जून 2026 रोजी दुपारी 12 ते 2 या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मंडळी मौजवाडी ता.जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

## महात्मा गांधी जयंती निमित्त व्याख्यान आणि उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार वितरण





**अंबाजोगाई :** आंतरभारती शाखा अंबाजोगाईच्या वतीने 2 ऑक्टोबर 2026 रोजी महात्मा गांधी जयंतीनिमित्त हेमंत धानोरकर यांचे 'महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर: समन्वयाच्या दिशा' या विषयावर व्याख्यान होणार आहे. याच कार्यक्रमात आंतरभारतीच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार सामाजिक कार्यकर्ते व्यंकटेश जोशी यांना अमर हबीब (विश्वस्त, केंद्रीय कार्यकारिणी, आंतरभारती) यांच्या हस्ते दिला जाणार आहे.

आंतरभारती शाखा अंबाजोगाईच्या वतीने मागील दोन वर्षापासून राबविण्यात येणाऱ्या आधुनिक तीर्थक्षेत्र भेटी या उपक्रमातील सर्वाधिक उपस्थित असणाऱ्या सदस्यांना या कार्यक्रमात सन्मानित करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते, ज्येष्ठ साहित्यिक अमर हबीब राहतील.

महात्मा गांधी जयंती व उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार वितरण समारंभ अंबाजोगाई येथील २ ऑक्टोबर रोजी, सायं ५.३० वाजता, आधार मल्टीस्टेट येथे होणार आहे. या कार्यक्रमासाठी गावातील विद्यार्थी, नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आंतरभारती शाखा अंबाजोगाईच्या अध्यक्ष प्रा. डॉ. शैलजा बरुरे, सचिव श्री संतोष मोहिते व कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

## सेवेतून व्यक्तिमत्त्व विकास आणि राष्ट्रनिर्मिती- रासेयो स्थापना दिनी प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांचे प्रतिपादन




**माजलगाव, प्रतिनिधी :** राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ शिबिरे, स्वच्छता अभियान किंवा वृक्षारोपणापुरती मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासोबतच राष्ट्रनिर्मितीची जीवनदृष्टी देणारे व्यासपीठ आहे, असे प्रतिपादन श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी केले. रासेयो स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

प्राचार्य डॉ. देवर्षी म्हणाले, रा. से. यो.चे ब्रीदवाक्य नॉट मी बट यु अर्थात मी नव्हे, आपण हे केवळ तीन शब्द नसून त्यामध्ये सेवाभावाचे संपूर्ण तत्त्वज्ञान सामावले आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकातील ज्ञान आत्मसात न करता समाजजीवन समजून घेणारे, सामाजिक प्रश्नांविषयी संवेदनशील आणि त्यावर प्रत्यक्ष कृती करणारे जबाबदार नागरिक बनले पाहिजे. यावेळी डॉ. सीताराम इंगोले यांनी विद्यार्थ्यांना रासेयो ची उद्दिष्टे व कार्यपद्धती समजावून सांगितली. तसेच विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ ठेवणे, पर्यावरणाचे संवर्धन करणे, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि व्यसनांपासून दूर राहून इतरांनाही त्यापासून परावृत्त करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. अशोक होके यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शिवशंकर मिटकरी यांनी केले, तर आभार डॉ. ज्ञानेश्वर यांनी मानले. उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना यांनी शांतिमंत्र सांगून कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळये, प्राध्यापक, कर्मचारी तसेच रा. से. यो.चे स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्रामीण भागात जाणारी अवैध दारू पकडली; स्कूटरसह 1.26 लाखांचा मुद्देमाल जप्त

**बीड :** जिल्ह्यात अवैध दारू विक्री व वाहतुकीवर सख्त कारवाई करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत यांनी दिले आहेत. त्या अनुषंगाने शहरातून ग्रामीण भागात दुचाकीवरून अवधैत्या चोरटी दारू घेऊन जाणारा एका तरुणावर शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने धडक कारवाई केली आहे. या कारवाईत देशी-विदेशी दारू आणि दुचाकीसह एकूण १ लाख २६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा सविस्तर तपशील असा की, दिनांक २०/०९/२०२६ रोजी रात्री ६.३० वाजेच्या सुमारास शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार अनिल कचरु घटमाळ हे सहकाऱ्यांसह पोलीस ठाण्याच्या हद्दीत खाजगी वाहनाने पेट्रोलिंग करत होते. या दरम्यान, नगर नाका, बीड येथून एका स्कूटरच्या डिकीमध्ये अवधैत्या चोरटी दारू घेऊन ग्रामीण भागात नेली जात असल्याची खात्रीशीर गुप्त बातमी पोलिसांना मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने दोन पंचना बोलावून सापळा रचला. रात्री ७.०० वाजेच्या सुमारास संशयित स्कूटर अडवून पोलिसांनी छापा टाकला व चालकाला ताब्यात घेतले. विचारपूस केली असता चालकाने आपले नाव रविंद्र भाऊसाहेब बहीर (वय २८ वर्षे, रा. राजुरी नवगण, ता. जि. बीड) असे सांगितले. त्यानंतर पंचासमक्ष त्याच्या स्कूटरच्या डिकीची तपासणी केली असता, त्यात देशी व विदेशी दारूचा साठा आढळून आला. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल- १. देशी संत्रा दारू- ९० मि.ली. च्या २५ सीलबंद बाटल्या (किमत ₹१,०००/-) २. मास्टर डिलाईट दारू-१८० मि.ली. च्या १० सीलबंद बाटल्या (किमत ₹१,५००/-) ३. रॉयल स्टॅग दारू- १८० मि.ली. च्या ०६ सीलबंद बाटल्या (किमत ₹४,०००/-) ४. सुझुकी बर्गमॅन स्कूटर- चॉकलेट रंगाची दुचाकी (क्रमांक MH23BG9719, अंदाजे किमत ₹१,२०,०००/-) - एकूण जप्त मुद्देमाल- ₹१,२६,५००/-

या प्रकरणी आरोपी रवींद्र भाऊसाहेब बहीर याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर धडक कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख साहेब व उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली केली आहे.

# माजलगाव धरण उंची वाढीला स्थगिती; आधी पाहणी मगच निर्णय - मंत्री पंकजा मुंडेंची ग्वाही



मुंबई / माजलगाव - माजलगाव धरणाची उंची वाढवण्याच्या प्रस्तावावरून पेटलेला शेतकऱ्यांचा आक्रोश अखेर मंत्रालयापर्यंत पोहोचला. जोपर्यंत प्रत्यक्ष स्थळावर जाऊन धरणाची आणि बाधित होणाऱ्या सर्व गावांची पाहणी व सर्वेक्षण होत नाही, तोपर्यंत धरणाची उंची वाढवण्याबाबत कोणताही निर्णय घेतला जाणार नाही, अशी ठोस ग्वाही आज जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील आणि पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांनी दिली.

मुंबईतील मंत्रालयात आज माजलगाव धरण उंचीवाडी संदर्भात युवाशक्ती संघर्ष समिती आणि भाजपाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांची अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत शेतकऱ्यांनी आपले अश्रू मांडले.

बैठकीत शेतकरी बांधवांनी भावनिक साद घातली. ते म्हणाले, "माजलगाव धरणाची उंची वाढवली तर आमची सुपीक शेतजमीन, आमचं घरदार, आमचं भविष्य सगळं जलमय होणार आहे! हा फक्त धरणाचा प्रश्न नाही, तर आमच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. आमच्या पूर्वजांनी रक्ताचं पाणी करून ही जमीन कसली, आज तीच जमीन डोळ्यादेखत पाण्यात बुडताना आम्ही कसे पाहू?"

या अन्यायाविरोधात नुकतेच शेतकऱ्यांनी आपल्या प्राणाची बाजी लावत तीव्र जलसमाधी आंदोलन पुकारले होते. "एकजूटच आपली ताकद आहे, शेतकरी वाचला पाहिजे" या एकाच निर्धाराने सर्व शेतकरी आज मुंबईत एकवटले होते.

शेतकऱ्यांची ही व्यथा ऐकून घेतल्यानंतर जलसंपदा मंत्री विखे पाटील व पर्यावरण पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी अत्यंत सकारात्मक भूमिका घेतली. त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळ होणार नाही. केवळ फाईलवर निर्णय न घेता, आम्ही स्वतः माजलगावला येऊन धरणाची पाहणी करून ,बाधित गावांना भेट देऊन सर्वेक्षण करू व शेतकऱ्यांशी संवाद साधू व शेतकरी व सिंचन विभागाचे अधिकारी यांच्यावतीने संयुक्त सर्वेक्षण केल्यानंतर अहवालाअंती पुढील अंतिम निर्णय घेतला जाईल तोपर्यंत माजलगाव धरण उंची वाढीच्या कामाला स्थगिती राहणार आहे असे मंत्रालयात झालेल्या नामदार विखे पाटील यांच्या दालनात दोन्ही मंत्री महोदयांनी सांगितले .

या आश्वासनामुळे संतप्त शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची भावना व्यक्त होत आहे. या मंत्रालयातील बैठकीच्या प्रसंगी माजलगाव येथील युवा शेतकरी संघर्ष समितीचे अजय सिंह राऊत जगदीश फरताडे मोहन जाधव योगेश कानडे अर्जुन नाईकनवरे तसेच भाजपाचे बदामराव पंडित माधव निर्मळ नितीन नाईकनवरे ज्ञानेश्वर मेंडके रूपाली कचरे विनायक रत्नपारखी गणेश शेंडगे ईश्वर खुरपे शरद कचरे शुभम महात्मे व भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# दुष्काळी परिस्थिती व संभाव्य टंचाईबाबत अंबाजोगाई येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक



**अंबाजोगाई :** केज विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी परिस्थिती, संभाव्य पाणीटंचाई, पीक नुकसान, पीक विमा, चारा व रोजगाराच्या प्रश्नांबाबत प्रशासनासोबत सविस्तर आढावा बैठक केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार सौ.नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या उपस्थितीत पार पडली. कमी पाऊस आणि पावसातील खंडामुळे शेतकरी अडचणीत आहेत. त्यामुळे पीक नुकसानीचे पंचनामे वेळेत पूर्ण करणे, पात्र शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळवून देणे तसेच पीक कापणी प्रयोग पारदर्शकपणे करण्याबाबत प्रशासनाला स्पष्ट सूचना देण्यात आल्या. टंचाईग्रस्त गावांमध्ये पिण्याचे पाणी, टँकर, जनावरांसाठी चारा-पाणी आणि रोजगाराच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देशही देण्यात आले.बैठक केवळ आढाव्यापुरती मर्यादित न राहता, घेतलेल्या प्रत्येक निर्णयाची कालबद्ध पद्धतीने अंमलबजावणी झाली पाहिजे, याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

यावेळी अंबाजोगाई नगराध्यक्ष नंदकिशोरजी (काकाजी) मुंदडा, अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती अश्विनी जिरंगे सोनवणे मॅडम, उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे साहेब, तहसीलदार विलास तरंगे साहेब, अंबाजोगाई नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी (CO) श्रीमती प्रियंका टोंगे मॅडम, उपविभागीय कृषी अधिकारी गायकवाड साहेब, पोलीस निरीक्षक (शहर व ग्रामीण), MSEB चे डेप्युटी इंजिनिअर (ग्रामीण व शहर), तालुका कृषी अधिकारी मुंडे साहेब, गटविकास अधिकारी, जलसंधारण विभागाचे अधिकारी तसेच इतर सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अंजिक्य निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत कुमार गटात धसदादा क्रिडा मंडळ तर कुमारी गटात शारदा स्पोर्ट क्लब, गेवराई सर्व प्रथम

## अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा उत्साहात संपन्न



**बीड (प्रतिनिधी)दि. २४ सप्टेंबर:** बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन व शारदा स्पोर्ट क्लब गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा -२०२६ या स्पर्धा श्री. शिवाजीराव पंडित महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी येथे शिवछत्र स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या. या स्पर्धेचे उदघाटन शारदा स्पोर्ट्स कल्ब चे अध्यक्ष युवा नेते श्री . रणवीर (काका )अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते संपन्न झाले होते..श्री रणवीर काका पंडित व बीड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्यवाह प्राचार्य.डॉ.विश्वास कदम यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करून प्रोत्साहन दिले.या स्पर्धेत कुमार गटात सर्व प्रथम क्रंमाकचे बक्षीस विभागुन धसदादा क्रिडा मंडळ, आष्टी व शारदा स्पोर्ट्स क्लब गेवराई या संघाने मिळविले तर कुमार गटातील तृतीय क्रंमाकाचे बक्षीस विभागुन जय हनुमान क्रिडा मंडळ, महासांगवी ता. पाटोदा व ण्णा हेल्थ क्लब,कुसळंब या संघाने मिळविले तर कुमारी गटात सर्व प्रथम बक्षीस विभागुन शारदा स्पोर्ट्स क्लब, गेवराई व ऑल स्पोर्ट्स अकॅडमी शिरूर कासार या संघाने मिळविले तर तृतीय क्रंमाकाचे बक्षीस जयभवानी हायस्कुल, शिवाजीनगर, गढी या संघाने प्राप्त केले. नियोजनपूर्वक व शिस्ती मध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झालेल्या स्पर्धेतुन विरार पश्चिम ता. वसई जि.पालघर येथे होणाऱ्या ५३ व्या कुमार/कुमारी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी बीड जिल्ह्याचा संघ निवडला जाणार आहे.या अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत यशस्वी झालेल्या क्रिडा मंडळाचे व खेळाडुचे बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन चे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री मा.श्री. शिवाजीरावदादा पंडित महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे राज्य उपाध्यक्ष माजी आ. श्री.अमरसिंह(भैय्यासाहेब) शिवाजीराव पंडित, बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन चे अध्यक्ष आ.श्री.विजयसिंह पंडित, मा.श्री. जयसिंह(भाऊ) शिवाजीराव पंडित,युवा नेते मा.श्री.पृथ्वी दादा जयसिंह पंडित यांनी विजयी संघाचे खेळाडूंचे,व प्रशिक्षकांचे हार्दिक अभिनंदन करुन! निवड झालेल्या सर्व खेळाडूंना राज्य स्तरीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा! दिल्या.

# तुलसी संगणकशास्त्र महाविद्यालयात रासेयो चा वर्धापन दिन उत्साहात



**बीड (प्रतिनिधी):** देवगिरी प्रतिष्ठान संचालित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे राष्ट्रीय सेवा योजनेचा ५७ वा वर्धापन दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर रासेयो गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डी.जी. निकाळजे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून गुरुकुल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल, डॉ. सुनील जोंधळे, उपप्राचार्य अंकुश सुर्वे, डॉ. योगिता लांडगे, प्रा. समीर मिर्झा आणि रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. किशोर वाघमारे उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे डॉ. विजयकुमार बांदल यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात जल व्यवस्थापन आणि जलसंवर्धन या विषयांचे महत्त्व स्पष्ट केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत राबविण्यात आलेल्या सामाजिक उपक्रमांचा सविस्तर आढावा त्यांनी घेतला. या कार्यातून समाजात निर्माण झालेल्या जाणीव-जागृतीचा लेखाजोखाही त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडला. डॉ. सुनील जोंधळे यांनी विद्यार्थ्यांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डी. जी. निकाळजे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, 'मी नव्हे, तुम्ही' या ब्रीदवाक्याचा आशय आणि योजनेच्या चिन्हातील रंगांचे महत्त्व विशद केले. स्वयंसेवकांनी ग्रामीण भागातील सामाजिक प्रश्नांचा अभ्यास करून स्थानिक गरजांनुसार विविध समाजोपयोगी उपक्रम हाती घ्यावेत, असे त्यांनी मार्गदर्शन केले.

## थायलंडच्या अष्टधातू बुद्धमूर्तीने सजणार कन्हेरवाडीचे बुद्ध विहार; 27 सप्टेंबरला सोहळा

**बीड (प्रतिनिधी) :** परळी तालुक्यातील कन्हेरवाडी येथील सम्राट अशोक बुद्ध विहारात थायलंडहून आणण्यात आलेल्या साडेतीन फूट उंचीच्या आणि सुमारे पंचवीस किलो वजनाच्या अष्टधातू बुद्धमूर्तीची रविवार, २७ सप्टेंबर रोजी भव्य प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी सुरू असून, प्रतिष्ठापनेपूर्वी मंगल वाद्यांच्या गजरात बुद्धमूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

आयु. लक्ष्मणराव रोडे दादा यांच्या वाढदिवसानिमित्त लक्ष्मणराव रोडे गुरुजी प्रतिष्ठान व समस्त रोडे परिवाराच्या वतीने या बुद्धरूप दान व प्रतिष्ठापना सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. थायलंडहून थेट कन्हेरवाडीत आणण्यात आलेली देखणी अष्टधातू बुद्धमूर्ती या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. मिरवणुकीनंतर भिक्खू संघाच्या उपस्थितीत बुद्धमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे.

या मंगल प्रसंगी अखिल भारतीय भिक्खू संघाचे कार्यकारी अध्यक्ष पूज्य भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो (पूर्णा), 'दि ग्रेट हॅपीनेस' युट्यूब चॅनेलचे संचालक पूज्य भदंत करुणानंद महाथेरो (छत्रपती संभाजीनगर), पूज्य भदंत पय्यातीस्स महाथेरो (सिरसाळा) तसेच प्रियदर्शी धम्म संस्कार संस्थेचे सचिव पूज्य भदंत धम्मशील थेरो (बीड) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यावेळी पूज्य भिक्खू संघ उपस्थितांना धम्मदेसना देणार आहेत.

दिवसभर चालणाऱ्या या धम्मसोहळ्याची सुरुवात सकाळी १०.३० ते दुपारी १.३० या वेळेत भोजनाने होईल. त्यानंतर दुपारी २ वाजता भिक्खू संघाची धम्मदेसना होणार असून, सायंकाळी ५ वाजता बुद्धरूप दान व प्रतिष्ठापना सोहळा संपन्न होणार आहे.

या मंगल व ऐतिहासिक धम्मसोहळ्यास परिसरातील उपासक-उपासिका, बौद्ध अनुयायी तसेच धम्मप्र

## मांजरा नदी काठच्या 50 शेतकऱ्यांच्या सुर्डी गावच्या विद्युत मोटर वायरची चोरी; शेतकरी दुहेरी संकटात

केज/प्रतिनिधी

पावसाअभावी मांजरा धरण कोरडे टाक पडले असून मांजरा धरणतून शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या विद्युत मोटरचे कनेक्शन विद्युत वितरण कंपनीने 1 महिन्यापूर्वी च कट केले आहेत. त्या मुळे मांजरा धरणा वरती आधारित शेती ऊस पिक गेली एक महिन्यापासून तग धरून आहेत मात्र पाऊस पडेल धरण भरेल या अपेक्षेने शेतकऱ्यांनी विद्युत मोटारी व वायर जरी कनेक्शन कट केले तरी नदीलाच ठेवलेले आहेत. मात्र पाऊस झालाच नाही याचा दुष्काळाचा फायदा घेत चोर आणि काल दिनांक 24/09/2026 रोज रात्री बाराच्या सुमारास तेलेवाडी ते सुर्डी मांजरा धरणाअंतर्गत च्या शेतकऱ्यांच्या 50 मोटार चे वायर चे वायर कट करून त्या वायर वरील सर्व वायरचे कव्हर बाजूला करून आत मधले तांबे व्यवस्थित करून चोरून नेले आहे. त्यामुळे दुष्काळात शेतकऱ्यावरती हे मोठे संकट कोसळले असून संबंधित चोरांना ताल्काळ अटक करून कायदेशीर कार्यवाही करावी अशी मागणी तेलेवाडी व सुर्डी परिसरातील सर्व शेतकऱ्यांकडून केली जात आहे. चोरांना ताल्काळ जेरबंद करण्यात यावे अशी मागणी रमेश भिसे यांनी केली आहे.

## 'ज्योती'च्या माध्यमातून फुले दाम्पत्याच्या शिक्षणक्रांतीला अभिवादन




**अंबाजोगाई :** महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून अजिंठा फिल्म सोसायटी,जळगाव यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'ज्योती' या चित्रपटाचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,अंबाजोगाईच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या मराठवाड्यातील १५ संकुलात ६८ ठिकाणी एकाच वेळी प्रदर्शन करण्यात आले.या उपक्रमात संस्थेच्या सहा जिल्ह्यांतील संकुलामधून तब्बल ३० हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून समाजपरिवर्तनाची चळवळ उभी केली. त्यांच्या शिक्षणविषयक कार्याची ओळख आणि त्यांच्या विचारांचा संस्कार नव्या पिढीवर व्हावा,या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

दि.२२ सप्टेंबर २०२६ मंगळवार रोजी सकाळी ठीक ११.३० वा.भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या अंबाजोगाई, माजलगाव,बीड,लातूर,उदगीर, गेवराई,पैठण,अंबड,देगलूर, धर्माबाद,नांदेड,सेलू,जिंतूर,संभाजीनगर आणि परळी या संकुलांतील एकूण ६८ ठिकाणी 'ज्योती' चित्रपट एकाच वेळी प्रदर्शित करण्यात आला.

अखिल भारतीय साहित्य परिषदेचे अध्यक्ष,लेखक,दिग्दर्शक व अभिनेते प्रा.योगेश सोमण लिखित व दिग्दर्शित 'ज्योती' हा चित्रपट महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणविषयक कार्यावर आधारित आहे.दृकश्राव्य माध्यमातून फुले दाम्पत्याचे कार्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचल्याने विद्यार्थ्यांना त्यांच्या संघर्षाची,विचारांची आणि सामाजिक परिवर्तनाच्या कार्याची प्रभावी ओळख झाली.

मागील चौदा वर्षांपासून विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या अजिंठा फिल्म सोसायटी, जळगाव यांच्या पुढाकारातून राज्यभर हा उपक्रम राबविण्यात आला.राज्यातील सुमारे १,८०० शाळांमध्ये एकाच दिवशी 'ज्योती' चित्रपटाचे प्रदर्शन झाले असून,सुमारे १० लाख विद्यार्थ्यांनी हा चित्रपट पाहिला.

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षात झालेल्या या उपक्रमास संस्थेतील सर्व संकुल प्रमुख,शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. एकाच वेळी ६८ ठिकाणी ३० हजार विद्यार्थ्यांपर्यंत फुले दाम्पत्याचा शिक्षणक्रांतीचा विचार पोहोचविणे,हे या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य ठरले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र अलुरकर,कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, सहकार्यवाह अमरनाथ खुर्पे तसेच अमृत महोत्सव संयोजन समिती आणि केंद्रीय कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांनी सहभागी विद्यार्थी,संकुल प्रमुख आणि शिक्षकांचे कौतुक केले. अमृत महोत्सवी वर्षात विद्यार्थ्यांना इतिहास,समाजपरिवर्तन आणि शिक्षणक्रांतीचा वारसा समजावून देणारा हा उपक्रम संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविणारा ठरला.

## कृषी साहित्याच्या यूपीआय व्यवहारांवरील शुल्क हटवा

**बीड दि.२४ (प्रतिनिधी):** बियाणे, खते, कीटकनाशके व इतर कृषी साहित्याच्या खरेदी-विक्रीसाठी होणारे डिजिटल व्यवहार कोणत्याही अतिरिक्त शुल्क किंवा एमडीआरच्या कक्षेत आणू नयेत, या व्यवहारांवरील शुल्क हटवा अशी मागणी अॅग्रो इनपुट डीलर्स असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष मनमोहन कलंत्री व राष्ट्रीय महासचिव प्रवीण पटेल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे निवेदनातून केली आहे. देशात डिजिटल व्यवहारांचे जाळे मोठ्या प्रमाणात विस्तारले असून यूपीआयमुळे सर्वसामान्य नागरिक आणि व्यापाऱ्यांना व्यवहार करणे सोपे झाले आहे. मात्र कृषी क्षेत्राशी संबंधित डिजिटल व्यवहारांवर प्रति व्यवहार पाच रुपये शुल्क किंवा अन्य कोणतेही शुल्क आकारले जाणार असल्याच्या वृत्तांमुळे कृषी निविष्ठा विक्रेते आणि शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाले आहे. कृषी निविष्ठांच्या खरेदी-विक्रीमध्ये डिजिटल पेमेंटचा वापर वाढत असूज या व्यवहारांवर कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क अथवा एमडीआर लागू होणार नाही याबाबत स्पष्ट निर्देश द्यावेत अशी मागणी संघटनेने केली आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# विद्यार्थी जीवन हा आयुष्यातील सर्वोत्तम काळ : श्रीकांत येरूळे

## सीएसएमएसएस' कृषि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा दीक्षारंभ कार्यक्रम संपन्न



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** विद्यार्थी जीवन हा आपल्या आयुष्यातील सर्वोत्तम काळ असून, या काळाचा प्रत्येकाने सदुपयोग करणे आवश्यक आहे. आपल्या आयुष्यातील या महत्त्वाच्या टप्प्याला आपण जितके महत्त्व देऊ, तितकाच तो आपल्या करिअरच्या टप्प्यावर आपल्याला नक्कीच फायदा करून देईल, असे प्रतिपादन एमजीएम विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी श्रीकांत येरूळे यांनी केले.

छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचालित कृषि महाविद्यालय, कांचनवाडी, बी.एस्सी.च्या प्रथम वर्षात २०२६-२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी दीक्षारंभ कार्यक्रमाचे आयोजन राजर्षी शाहू महाराज सभागृहात करण्यात आले होते. यावेळी 'स्टुडंट लाइफ टू सक्सेसफुल प्रोफेशनल' या विषयावर श्री. येरूळे यांचे व्याख्यान झाले. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत विद्यार्थी जीवनातील विविध पैलूंवर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. एम. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. ए. ए. भोंडवे,विभागप्रमुख डॉ. पी. एस. बैनाडे, प्राध्यापक, विद्यार्थी व संबंधित उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री. येरूळे म्हणाले, विद्यार्थी जीवनातून यशस्वी व्यावसायिक होण्याच्या प्रवासात स्वप्न, सवयी, वेळेचे नियोजन, व्यक्तिमत्त्व विकास आणि नेतृत्वगुण या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. मोठी स्वप्ने पाहा, चांगल्या सवयी लावा, वेळेचा योग्य उपयोग करा आणि स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवा. आजच्या काळात समाजमाध्यमांचा वापर करताना विशेष काळजी घ्यायला हवी. विद्यार्थ्यांचा स्क्रीन टाईम मोठ्या प्रमाणात वाढला असून, त्याला पर्याय म्हणून स्वतःला पुस्तके वाचण्याची सवय लावली पाहिजे. आपल्या करिअरसह शेती, करिअरपलीकडचे जीवन, जबाबदार नागरिकत्व आणि आरोग्य यांचाही विचार करा. या सर्वांपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, यशस्वी व्यावसायिक होण्याबरोबरच एक चांगला माणूस होण्याचा प्रयत्न करा; कारण शेवटी तुमची ओळख केवळ तुम्ही काय कमावले यावर नाही, तर तुम्ही किती चांगला माणूस म्हणून जगलात यावर ठरत असते.

दीक्षारंभ कार्यक्रम हा प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या नव्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रवासाची महत्त्वपूर्ण सुरुवात आहे. शेती क्षेत्र हे देशाच्या विकासात आणि प्रगतीत सातत्याने महत्त्वपूर्ण योगदान देत आले आहे. या महत्त्वाच्या क्षेत्रात येण्याचा निर्णय विद्यार्थ्यांनी घेतला असून, भविष्यात शेती क्षेत्राच्या प्रगतीत योगदान देत तेच उद्याच्या भारताचे नेतृत्व करणार आहेत, असे प्रतिपादन उपप्राचार्य प्रा. ए. ए. भोंडवे यांनी केले. तसेच उत्कृष्ट लेखन, प्रभावी संवाद कौशल्य आणि एम.जी.एम. विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी श्री श्रीकांत येरुळे यांचा परिचय प्रा.डॉ.सुशिल सातपुते यांनी करून दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरीश वानखेडे यांनी केले तर आभार कुणाल मस्के यांनी मानले.

## नगराध्यक्ष संजय जाधव यांची शहरातील नृसिंह गणेश मंडळाला भेट



तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.२४:** गंगापूर शहरातील विविध गणेशोत्सव मंडळांना नगराध्यक्ष संजय जाधव यांनी भेट देऊन दर्शन घेतले. गंगापूर शहरातील नृसिंह गणेश मंडळ गणेशोत्सव या मंडळाला सायंकाळी आरती दरम्यान नगराध्यक्ष संजय जाधव यांनी भेट देऊन दर्शन घेतले यावेळी त्यांच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते नगरसेवक संतोष आंबिलवादे तुकाराम सटाले ॲडवोकेटअविनाश कुलकर्णी नृसिंह गणेश मंडळाचे अध्यक्ष गणेश अंबिलवादे मोहित कुलकर्णी अथर्व कुलकर्णी आदी यावेळी उपस्थित होते. सालाबादप्रमाणे मंडळाकडून मोठ्या प्रमाणात महाप्रसाद करण्यात आला यावेळी असंख्य महिला भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## हृदयविकारापासून बचावासाठी धूत हॉस्पिटलकडून जनजागृती; 27 ला संत एकनाथ रंगमंदिरात विशेष कार्यक्रम



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** हृदयविकाराचे वाढते प्रमाण आणि बदलती जीवनशैली लक्षात घेता नागरिकांमध्ये हृदयाच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल अँड रिसर्च फाऊंडेशनच्या वतीने जागतिक हृदय दिनानिमित्त विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (२७ सप्टेंबर) सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत संत एकनाथ रंगमंदिर येथे हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमासाठी नागरिकांना विनामूल्य प्रवेश देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात वरिष्ठ हृदयरोग तज्ज्ञ तथा विभागप्रमुख डॉ. विलास मगरकर आणि त्यांच्या हृदयरोग विभागातील तज्ज्ञांची टीम हृदयविकाराची कारणे, लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, उपचारपद्धती तसेच हृदय निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक जीवनशैली याबाबत मार्गदर्शन करणार आहे. हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी दैनंदिन जीवनशैलीत कोणते बदल करावेत, याबाबतही नागरिकांना माहिती दिली जाणार आहे.

आहारतज्ज्ञ रेणुका राजे यांच्याकडून हृदयाच्या आरोग्यासाठी योग्य आहार, आहारातील आवश्यक बदल आणि निरोगी जीवनशैली याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यामुळे हृदयविकाराच्या प्रतिबंधासोबतच आहार आणि आरोग्य यांचा परस्पर संबंध नागरिकांना समजावून सांगितला जाणार आहे.

हृदयविकारापासून बचावासाठी वेळेवर तपासणी, योग्य आहार, नियमित व्यायाम आणि निरोगी जीवनशैली आवश्यक आहे. या बाबींबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी अल्पोपहार व चहापानाची व्यवस्था करण्यात आली आहे.

नागरिकांनी कुटुंबीय, मित्र आणि सहकाऱ्यांसह या विनामूल्य जनजागृती कार्यक्रमात सहभागी होऊन हृदयाच्या आरोग्याविषयी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे, असे आवाहन सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## माजी सरपंच सुवर्णा पाटील यांना राज्यस्तरीय 'महाराष्ट्ररत्न गुणगौरव पुरस्कार 2026' जाहीर



तभा.वृत्तसेवा

सोयगाव दि.२३ सप्टेंबर

सोयगाव तालुक्यातील घोसला ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच सुवर्णा ज्ञानेश्वर पाटील यांची राज्यस्तरीय प्रतिष्ठित 'महाराष्ट्ररत्न गुणगौरव सन्मान पुरस्कार २०२६' साठी निवड करण्यात आली आहे. नालंदा ऑर्गनायझेशन (पुणे) या संस्थेच्या सर्वेक्षणादरम्यान त्यांनी केलेल्या उत्कृष्ट लोकोपयोगी व ग्रामविकास कामांची दखल घेऊन ही अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.

हा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा रविवार २७ सप्टेंबर २०२६ रोजी पत्रकार भवन, नवी पेठ, पुणे येथे पार पडणार आहे.या सोहळ्यात विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या हस्ते सुवर्णा पाटील यांना 'महाराष्ट्ररत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल.

## राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन उत्साहात साजरा; डॉ.सैराज तडवी यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन; स्वयंसेवकांकडून स्वच्छता व पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था




तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२४ सप्टेंबर

अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ.सैराज तडवी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन का साजरा केला जातो, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवा,राष्ट्रसेवा,सामाजिक बांधिलकी व सेवाभाव कसा विकसित होतो, याबाबत त्यांनी सविस्तर विवेचन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार होते. प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सुनील चौधरे यांनी केले. सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक पाराधे यांनी केले.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी केवळ महाविद्यालयीन जीवनातच नव्हे, तर समाजातही सेवाभावाने कार्य करण्याचे आवाहन केले. "समाजसेवा ही केवळ एक दिवसाची कृती नसून ती जीवनाचा एक भाग बनली पाहिजे. स्वयंसेवकांनी पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, सामाजिक जनजागृती आणि गरजू व्यक्तींना मदत करण्यासाठी सदैव पुढाकार घ्यावा," असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक जाणीव, शिस्त आणि राष्ट्राप्रती जबाबदारीची भावना विकसित होते, असेही त्यांनी नमूद केले. आभार प्रदर्शन डॉ. मनोजकुमार चोपडे यांनी मानले.

यावेळी डॉ.उल्हास पाटील, डॉ. गणेश मिसाळ, डॉ. संतोष पडघन,डॉ.पंकज गावित, प्रा. रवींद्र जाधव, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसरात विविध सेवाभावी उपक्रम राबविले. स्वयंसेवकांनी झाडांना आळी करून पाणी दिले, पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था केली तसेच महाविद्यालय परिसराची स्वच्छता केली. या उपक्रमातून स्वयंसेवकांनी पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि समाजसेवेचा संदेश दिला.

## विराज आय अँड डेंटल हॉस्पिटल येथे पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती



तभा वृत्तसेवा

**बिडकीन दि २४ सप्टेंबर छत्रपती संभाजीनगर :**श्री गणेशोत्सवाच्या पावन पर्वानिमित्त विराज आय अँड डेंटल हॉस्पिटल, येथे शहराचे पोलीस आयुक्त . प्रवीण पवार यांच्या उपस्थितीत श्री गणेशाची आरती संपन्न झाली.यावेळी डॉ. रमेशजी जाधव व . जाधव, डॉ. दिवाकरजी कुलकर्णी, डॉ. सविताजी कुलकर्णी, डॉ. संदीपजी दाफळे व दाफळे उपस्थित होते.या प्रसंगी महाराष्ट्रात शिक्षणासाठी आलेल्या ईशान्य भारतातील विद्यार्थिनीही उपस्थित होत्या. अनेक वर्षांपासून आपल्या घरापासून दूर राहून शिक्षण घेणाऱ्या या विद्यार्थिनींशी मा. प्रवीण पवार आत्मीयतेने संवाद साधला. त्यांच्या अडचणी जाणून घेत, कोणत्याही मदतीची आवश्यकता भासल्यास आपण त्यांच्या पाठीशी उभे आहोत, असा विश्वास त्यांनी दिला.यावेळी व खिवंसराजी, गोसावीजी, . किशोरजी एस.डॉ. अग्रवाल व केदार जोशी तसेच व कोहली यांचीही उपस्थिती होती.गणेशोत्सवाच्या निमित्ताने घडलेला हा स्नेहसंवाद सामाजिक बांधिलकी, परस्पर विश्वास आणि आपुलकीची भावना अधिक दृढ करणारा ठरला.

## अमृतवाहिनी एमबीएच्या 07 विद्यार्थ्यांची 6.12 लाखांच्या वार्षिक पॅकेजवर निवड



**संगमनेर :** अमृतवाहिनी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (AIMBA), संगमनेर येथील एमबीएच्या सात विद्यार्थ्यांची हाउसी कीमॅन्शन्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमध्ये रिलेशनशिप मॅनेजर पदासाठी निवड झाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक ६.१२ लाख रुपयांचे वेतन पॅकेज मिळाले आहे. महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. एम. लोंढे यांनी ही माहिती दिली.

या निवड प्रक्रियेत सोनल गायकवाड, ओंकार घोडके, अमोल नागरे, ओम अनेराव, आरती शिंदे, ऐश्वर्या सालबंदे आणि आकांक्षा बोरुडे या सात विद्यार्थ्यांनी यश मिळविले.

विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक कौशल्यांचा विकास, उद्योगाभिमुख प्रशिक्षण, संवादकौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, मुलाखत तंत्र तसेच करिअर मार्गदर्शनावर अमृतवाहिनी एमबीएमध्ये सातत्याने भर दिला जातो. बदलत्या उद्योगक्षेत्राच्या गरजांनुसार विद्यार्थ्यांमध्ये रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात.

महाविद्यालयाच्या प्लेसमेंट विभागामार्फत विविध नामांकित कंपन्यांशी समन्वय साधून कॅम्पस इंटरव्ह्यू, प्री-प्लेसमेंट ट्रेनिंग, मॉक इंटरव्ह्यू, ग्रुप डिस्कशन आणि कौशल्यविकास उपक्रम आयोजित केले जातात. या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना विविध उद्योगक्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. एकाच कंपनीमध्ये एमबीएच्या सात विद्यार्थ्यांची निवड होणे ही महाविद्यालयाच्या उद्योगाभिमुख शिक्षणपद्धती आणि प्लेसमेंट प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण कामगिरी मानली जात आहे.

अमृतवाहिनी एमबीए महाविद्यालयाची स्थापना सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून १९९४-९५ मध्ये झाली. त्यानंतर माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने विविध क्षेत्रांत कार्य केले आहे. उत्कृष्ट निकालाची परंपरा, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांची प्लेसमेंट, विविध सेमिनार व परिषदांचे आयोजन तसेच नवउद्योजक घडविण्याच्या उपक्रमांवर संस्थेकडून भर दिला जातो. महाविद्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असून ISO मानांकन प्राप्त आहे. सन २०२४ मध्ये महाविद्यालयाला NAACचे 'A' ग्रेड मानांकन मिळाले आहे. व्यवस्थापनशास्त्रातील संशोधन केंद्रासही विद्यापीठाची मान्यता आहे. महाविद्यालयातील दहा प्राध्यापकांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून पीएच.डी. पदवी प्राप्त केली असून ते संशोधन केंद्रात पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. संशोधन केंद्रात ३५ संशोधक विद्यार्थी पीएच.डी.चे शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब थोरात, विश्वस्त आमदार डॉ. सुधीर तांबे, विश्वस्त सौ. शरयू देशमुख, साखर कारखान्याचे संचालक इंद्रजीत थोरात, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे आणि व्यवस्थापक प्रा. व्ही. बी. धुमाळ यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## द्रोपदाबाई पाचपुते यांचे निधन



**गंगापूर दि.२४:** द्रोपदा बाई सखाराम पाचपुते वय (७०) यांचे दि.२४ गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता निधन झाले त्या गळनिंब विविध कार्यकारी सोसायटीच्या विद्यमान संचालक होत्या.

त्यांच्या पश्चात एक मुलगा एक मुलगी जावई सून नातवंडे असा परिवार होता. त्या अनिल पाचपुते यांच्या मातोश्री होत्या व बापू देव पाचपुते यांच्या त्या वहिनी होत्या. त्यांचा अंत्यविधी चार वाजता गळनिंब स्मशानभूमीमध्ये करण्यात आला यावेळेस पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते.

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

ई निविदा क्र ANMC_1340445- 16

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील विविध विकास कामाच्या अनुषंगाने अहिल्यानगर महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजनेअंतर्गत सन २०२६- २०२७ लेखाशीर्षक (२२१७८२६२) अंतर्गत विकास कामे या कामाचे तपशिल https:www.mahaetenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/-
उपायुक्त
अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

**जाहीर प्रगटन**

**मा.तिसरे सह दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद (श्रीमती के.एफ. चौधरी मॅडम कोर्ट)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. 684/2026

संतोष सुरेशराव जोशी व इतर
विरुध्द
निरंक

प्रकरण :- वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज

ज्याअर्थी सुरेशराव माधवराव जोशी दि. 14/12/2019 रोजी आणि सुरेशराव माधवराव जोशी यांची पत्नी प्रभावती सुरेशराव जोशी दि.31/01/2018 रोजी गंगापुर, ता. गंगापुर येथे मृत्यु पावलेले असुन अर्जदार क. 1) संतोष सुरेशराव जोशी व 2) प्रमोद सुरेशराव जोशी हे दोघेही मयतांची मुले असुन अर्जदार क. 3) ज्योती प्रमोद जोशी हि मयताची विवाहित मुलगी आहे. सदर अर्जदार क. 1 ते 3 यांनी मयतांचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.पी.बी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला असुन

त्याअर्थी अर्जदार नं. 1 ते 3 यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून 30 दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.23/09/2026.

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

# एसएसपीने (SSP)आखला नैसर्गिक शेतीकडे नेणारा "वन एकर मॉडेल" चा मार्ग आहे

## नवी दिल्ली येथे राष्ट्रीय संवाद; महिला शेतकरी, धोरणकर्ते, संशोधक आणि तज्ज्ञांचा सहभाग




सिल्लोड प्रतिनिधी

**नवी दिल्ली, 24 सप्टेंबर 2026 :** नैसर्गिक शेतीचा स्वीकार करण्यामध्ये शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी आणि त्यावर उपाययोजनांवर चर्चा करण्यासाठी स्वयं शिक्षण प्रयोग यांच्या वतीने नवी दिल्ली येथे राष्ट्रीय संवादाचे आयोजन करण्यात आले. 'Bridging the Last Mile Transition for Natural Farming Adoption' या अहवालाचे यावेळी प्रकाशन करण्यात आले.

विश्व युवक केंद्र, नवी दिल्ली येथे झालेल्या या संवादात केंद्र व राज्य शासनाचे अधिकारी, धोरणकर्ते, संशोधक, कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी तसेच महाराष्ट्र, केरळ आणि कर्नाटकातील महिला शेतकरी सहभागी झाल्या.

राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानाच्या माध्यमातून नैसर्गिक शेतीचा विस्तार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू आहेत. मात्र, शेतकऱ्यांमध्ये नैसर्गिक शेतीबाबत जागरूकता निर्माण होऊनही प्रत्यक्ष शेती पद्धतीमध्ये त्याचे रूपांतर होण्याचे प्रमाण अपेक्षेइतके नाही. शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीची इच्छा नसल्यामुळे नव्हे, तर कमी जोखमीने सुरुवात करण्यासाठी आवश्यक आधारव्यवस्था नसल्यामुळे ते संपूर्ण शेतीत बदल करण्यास संकोच करतात, असे एसएसपीने मांडले.

'एक एकर मॉडेल'मधून कमी जोखमीची सुरुवात

एसएसपीच्या महिला पुढाकारतून हवामान पुरक शेती कार्यक्रमांतर्गत विकसित करण्यात आलेल्या 'वन एकर मॉडेल' मध्ये शेतकऱ्यांना संपूर्ण शेतीचे एकाच वेळी रूपांतर करण्याऐवजी सुरुवातीला पाचवा हिस्सा ते एक एकर क्षेत्रावर नैसर्गिक शेती करण्यास प्रोत्साहन दिले जाते.

या क्षेत्रात पाच किंवा त्यापेक्षा अधिक अन्नपिकांची लागवड नैसर्गिक निविष्ठांच्या माध्यमातून केली जाते. उर्वरित क्षेत्रातील शेती पूर्वीच्या पद्धतीने सुरू ठेवता येत असल्याने कुटुंबाच्या उत्पन्नावर अचानक मोठी जोखीम येत नाही. तसेच उत्पादित अन्नधान्याचा प्रथम वापर कुटुंबाच्या अन्नसुरक्षेसाठी केला जातो. या प्रयोगातून सकारात्मक परिणाम दिसू लागल्यानंतर शेतकरी हळूहळू अधिक क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणू शकतो.

२.७५ लाख महिलांनी स्वीकारले मॉडेल

एसएसपीच्या माहितीनुसार, 'एक एकर मॉडेल'चा अवलंब चार राज्यांतील 1,660 गावांमधील सुमारे 2 लाख 75 हजार महिलांनी केला आहे. 2024-25 मध्ये 95,000 महिला शेतकऱ्यांवर करण्यात आलेल्या अंतर्गत अभ्यासानुसार, नैसर्गिक शेतीचा अवलंब करणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेती निविष्ठांवरील खर्चात दरवर्षी सरासरी ₹40,000 पर्यंत बचत झाली असून स्थानिक अन्नपिकांच्या उत्पादकतेत 18.6 टक्के वाढ झाल्याचे आढळून आले.

एसएसपीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नसीम शेख म्हणाल्या, "शेतकरी नैसर्गिक शेती स्वीकारण्यासाठी केवळ समजावून सांगण्याची वाट पाहत नाहीत. त्यांच्या कुटुंबाच्या अन्नसुरक्षेला धोका न पोहोचवता सुरुवात करण्याचा मार्ग ते शोधत आहेत. एक एकर क्षेत्र प्रयोगासाठी पुरेसे लहान आणि परिणाम सिद्ध करण्यासाठी पुरेसे मोठे आहे."

राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानासाठी चार प्रमुख सूचना

अहवालामध्ये राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानाच्या अंमलबजावणीसाठी चार प्रमुख प्रस्ताव मांडण्यात आले आहेत.

संपूर्ण शेतीचे एकाच वेळी रूपांतर करण्याऐवजी टप्प्याटप्प्याने आणि प्लॉटच्या पातळीवर नैसर्गिक शेतीचा प्रवेश मार्ग मान्य करावा.

केवळ एकदाच प्रशिक्षण देण्याऐवजी अनेक हंगामांपर्यंत सातत्यपूर्ण मार्गदर्शन व हातधरणी उपलब्ध करून द्यावी.

स्थानिक पातळीवर जैविक निविष्ठांची उपलब्धता वाढविण्यासाठी क्लस्टर स्तरावर समुदायाच्या मालकीची उद्यमव्यवस्था विकसित करावी.

निवडक जिल्ह्यांमध्ये या मॉडेलचे प्रायोगिक स्तरावर विस्तार करून राज्य ग्रामीण उपजीविका अभियान आणि विद्यमान कृषी विस्तार यंत्रणेशी समन्वय साधावा. कार्यक्रमात श्री चरनजीत सिंह (निवृत्त IFS), माजी अतिरिक्त सचिव, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय यांनी, "महिला शेतकऱ्यांसाठी प्रभावी परिणाम साधण्यासाठी संपूर्ण परिसंस्थेच्या सामूहिक क्षमतेचा उपयोग करण्याची गरज आहे," असे मत व्यक्त केले.

**जाहिर प्रगटन**

**मा.दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ११९/२०२६.

अर्जदार : १. मासुमबाई गुलजार तडवी, वय, ७७ वर्षे, धंदा, घरकाम, २. दिलीप गुलजार गवळी (तडवी), वय. ५० वर्षे, धंदा. मजुरी, ३. वजीर गुलजार गवळे (तडवी), वय. ३६ वर्ष, धंदा. मजुरी, सर्व रा. टिटवी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर, ४. अफशान मज्जीत तडवी, वय. ४६ वर्षे, धंदा, घरकाम, रा. टाकरखेडे, ता. जामनेर, जि. जळगांव. ५. रुखसाना अल्लाऊददीन तडवी, वय. ५८ वर्षे, धंदा. घरकाम, रा. शेवगे पिंप्री, ता. जामनेर, जि. जळगांव. ६. शबनम बशीर तडवी, वय, ३६ वर्षे, धंदा, घरकाम, रा. मांडवे बु., ता. जामनेर, जि. जळगांव. ७. हमीदा दादामिया तडवी, वय. ४८ वर्षे, धंदा. घरकाम, रा. पिंपळगांव बु., ता. पाचोरा, जि. जळगांव. ८. शारदाबाई गुलाबस तडवी, वय, ६० वर्षे, धंदा. घरकाम, रा. टाकरखेडा, ता. जामनेर, जि. जळगांव.

-विरुध्द-

गैरअर्जदार :- कोणीही नाही.

प्रकरण :- वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी अँड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत गुलजार बाळा तडवी हे दि. २७/०४/२०२६ रोजी मौजे. टिटवी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ८ हे गुलजार बाळा तडवी यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल.

पुढील तारीख :- २९/१०/२०२६.

आज दि. २४/९/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशावरुन
कनिष्ठ लीपीक सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं.६७४/२०२६

अर्जदार:-१. रेशमा सोमनाथ पवार, वय. २९ वर्ष धंदा. शेती रा. एकता नगर, छ.संभाजीनगर ता. जि.छ.संभाजीनगर स्थायी पत्ता देवळी ता. गंगापूर गंगापुर जि.छ.संभाजीनगर २. अवी सोमनाथ पवार, वय. १७ वर्ष धंदा. शेती रा. कारंबा, सोलापुर नॉर्थ, नानज ता. जि. सोलापूर स्थायी पत्ता देवळी ता. गंगापूर गंगापुर जि.छ. संभाजीनगर करिता अ.पा. क. अर्जदार नं. १ (आई) रेशमा सोमनाथ पवार ३. अदिती सोमनाथ पवार, वय. १३ वर्ग धंदा. शिक्षण रा. देवळी ता. गंगापूर गंगापुर जि.छ. संभाजीनगरकरिता अ.पा.क. अर्जदार नं. १ (आई) रेशमा सोमनाथ पवार

-: विरूद्ध:-

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण:- कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज दाखल केला असुन, कथन केले की,

असे की, अर्जदार नं. १ यांचे पती तसेच अर्जदार नं. २ ते ३ यांचे वडिल नामे सोमनाथ प्रल्हाद पवार हे दि. १२/११/२०२४ रोजी मौजे कारंबा ता. सोलापुर जि. सोलापुर येथे मयत झाले आहेत व तसेच मयत नामे सोमनाथ प्रल्हाद पवार यांचे वडील व आई हे बऱ्याच वर्षापूर्वी मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्या व्यतिरिक्त मयत सोमनाथ प्रल्हाद पवार यांना इतर दुसरे कोणीही वारस नाही व अर्जदार हे मयत सोमनाथ प्रल्हाद पवार यांचे कायदेशीर वारस आहेत.

ज्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत सोमनाथ प्रल्हाद पवार यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा मुदतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत सोमनाथ प्रल्हाद पवार यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नंतर येणारा आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. करिता सदरील जाहीर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्यानिशी दिली आहे.

आदेशावरुन
कनिष्ठ लीपीक सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

## अग्रलेख

# दुष्काळाचे ‘शापित’ वर्तमान

फुले गळालेले सोयाबीन, निष्पात झालेली कपाशी आणि पिवळे पडलेले धान, पाण्याची पातळी खाली गेल्याने अडचणीत आलेले उसाचे पीक आणि अन्य पिकांची वाईट स्थिती हे सध्याचे महाराष्ट्राचे चित्र आहे. सलग महिनाभर पाऊस हुलकावण्या देत राहिला. खरीप हंगामाची पार वाताहत झाली. बळीराजाचे हिरवे स्वप्न उगवण्याआधीच कोमजले. नाही म्हणायला, शेतात पीक कसेबसे उभे असल्याचे दिसते. पुरेशा उत्पादनाची मात्र शाश्वती नाही. अवघ्या राज्यात दुष्काळाचे सावट गडद होत चालले आहे. अशा स्थितीत, केंद्र सरकारकडून येणाऱ्या आर्थिक मदतीची वाट न पाहता संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनच तातडीने मदत करणार, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. सध्या राज्यकर्त्यांच्या कुठल्याही अन्य घोषणेपेक्षा ही घोषणा जास्त महत्त्वाची आणि अत्यावश्यक आहे. सरकारचा हा निर्णय शेतकऱ्यांविषयी संवेदना दर्शवणारा आहे आणि म्हणूनच त्याचे स्वागत केले पाहिजे. राज्य सरकारने केंद्राकडे ‘एनडीआरएफ’च्या नियमानुसार मदतीचा प्रस्ताव पाठवण्याची प्रक्रिया सुरू ठेवत, स्वतःच्या निधीतून मदतीचे वाटप करणार असल्याचेही सांगितले, हे उत्तमच. पण या निर्णयाचे खरे यश तेव्हाच सिद्ध होईल, जेव्हा ही मदत शेतात राबणाऱ्या शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत कोणतीही दप्तरदिरंगाई न होता पोहोचेल.

सणासुदीची लगबग सुरू झालेली आहे. अवघ्या काही दिवसांवर दसरा आणि त्या पाठोपाठ आशेचे दिवे तेजाळणारी दिवाळी आहे. दीपोत्सवाचे स्वागत करण्यासाठी नटलेली शहरे उत्साहात न्हाऊन निघतील, तेव्हा महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातल्या बळीराजाच्या घरात अंधार आणि शांतता पसरलेली असेल, असे घडता कामा नये. सर्वत्र आनंद साजरा होत असताना, ज्याच्या पिकावर अवघ्या जगाची भूक भागते, त्या शेतकऱ्याच्या खिशात फुटकी दमडीही नसणे यापेक्षा कमालीचे दुःखदायक चित्र दुसरे कोणते असू शकते? सणासुदीच्या दिवशी घराघरांत गोडधोड केले जात असताना, अन्नाच्या कणासाठी झुरणारा शेतकरी आणि त्याच्याकडे केविलवाण्या नजरेने पाहणाऱ्या चिमुकल्यांच्या मनात काय चालले असेल, याचे वर्णन कोणत्या शब्दांत मांडायचे? चिमुकल्यांच्या अपेक्षा आणि त्या पूर्ण करू न शकणाऱ्या बापाचे हेलावणारे मन यापेक्षा आणखी कोणतीही अगतिकता असू शकत नाही. आपल्यासोबत शेतात राबणाऱ्या अर्धांगिनीची, शेतात भाकर घेऊन येणाऱ्या मुलांची सणांच्या काळात साध्या नव्या कपड्यांची इच्छाही पूर्ण करू न शकल्याची जाणीव शेतकऱ्याचा आत्मा तळमळण्यास असते. सावकाराचे तगादे, बँकांची कर्जे आणि कुटुंबाची भूक या तिन्ही बाजूंनी शेतकरी जेव्हा घेरला जातो, तेव्हा स्वतःला संपवण्याचा विचार करतो. कालपर्यंत ज्या शेतात घाम गाळून त्याने सोने पिकवण्याचे स्वप्न पाहिलेले असते, त्याच शेतात रात्रीच्या अंधारात तो गळफास घेतो किंवा पिकावर फवारण्याचे कीटकनाशक घशात ओतून मरतो. गेली अनेक दशके आपण हे चित्र पाहतो आहोत. ही अवघ्या समाजाच्या छाताडावरची भयंकर वेदनादायी जखम आहे. सणासुदीच्या तोंडावर अशा काळीज चिरणाऱ्या घटना आवर्जून घडतात, हे सरकारला समजले पाहिजे. त्यामुळे सरकारने आता कागदी घोडे नाचवण्यात आणि औपचारिकता पूर्ण करण्यात अजिबात वेळ घालवू नये. दुष्काळ जाहीर करून, दसऱ्याच्या आतच बळीराजाला आर्थिक दिलासा दिला पाहिजे.

महाराष्ट्रातील पावसाची आणि दुष्काळाची आकडेवारी पाहिल्यास परिस्थिती किती चिंताजनक आहे, याचा अंदाज येतो. हवामान विभाग आणि महसूल विभागाच्या आकडेवारीनुसार, यंदाच्या मान्सून हंगामात संपूर्ण महाराष्ट्रात सरासरीच्या तुलनेत सुमारे १८.८ टक्के ते १९ टक्क्यांपर्यंत पावसाची तूट नोंदविली गेली आहे. राज्यातील एकूण पावसाची सरासरी ९३२.३ मिमी असताना यंदा प्रत्यक्षात केवळ ७५५.९ मिमी एवढाच पाऊस झाला. हीच तूट विभागवार पाहिली, तर परिस्थितीचे आणखी भीषण रूप स्पष्ट होते. मराठवाड्यात पावसाची तूट तब्बल ३०.८ ते ३१.४ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. मराठवाड्यातील धाराशिव, बीड, लातूर, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांमध्ये जुलै महिन्यानंतर पावसाचा एक थेंबही पडलेला नाही. त्यामुळे तेथे ४० ते ५० टक्क्यांहून अधिक पावसाचे दुर्भिक्ष्य आहे. सोलापूर, अमरावती, अकोला, वाशीम, वर्धा, जळगाव आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांची अवस्थाही बिकट असून, तेथे ३५ ते ४५ टक्क्यांची प्रचंड तूट आहे. पावसाच्या या प्रदीर्घ खंडाने राज्यातील ६० टक्क्यांहून अधिक शेतीचे नुकसान केले आहे. खरिपाच्या सोयाबीन, कापूस, तूर, मूग आणि उडीद पिकाला पावसाची खूप गरज असताना तब्बल ४५ दिवसांचा खंड पडला. परिणामी ही पिके करपली. चंद्रपूर जिल्ह्यातील एक शेतकरी आपली व्यथा मांडताना म्हणाला- ‘‘तीन वर्षांनंतर यंदा पहिल्यांदा सोयाबीन घेतले. पीक फुलोऱ्यात आले आणि पावसाने दांडी मारली. शेंगा कमी आल्या. आता त्यासाठी केलेला खर्चही अंगावर येत आहे.’’ राज्यातल्या बहुतांशी शेतकऱ्यांची दैना यापेक्षा वेगळी नसेल. अवघ्या देशातच सोयाबीन उत्पादनात ३० टक्क्यांपेक्षा जास्त घट होण्याची भीती कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. त्यातच ‘एल निनो’च्या प्रभावामुळे भूजल पातळी पार तळाला गेली आहे. मराठवाडा आणि विदर्भाच्या कठीण खडकाळ भागात पाणी जिरण्याचे प्रमाण आधीच कमी असल्याने पिण्याच्या पाण्याची आणि चाऱ्याची भीषण टंचाई आतापासूनच जाणवू लागली आहे. विहिरी आणि बोअरवेल कोरडे पडत चालले आहेत, तर धरणांमधील उपयुक्त जलसाठा चिंताजनक पातळीवर खाली उतरला आहे. अरुण साधूंची ‘शापित’ कादंबरी ज्याने वाचली असेल, त्याला हे सारे संदर्भ लक्षात येतील. त्यातील एका दुष्काळग्रस्त अल्पभूधारक शेतकऱ्याची आणि त्याच्या कुटुंबीयांची झालेली वाताहत व्याकूळ करून जाते. त्यातली वामन, रुक्मिणी, नानी, ज्ञानोबा, सरजा, तुकाराम ही सारी पात्र म्हणजे दुष्काळाने जमीन फाटावी तशी फाटलेली, तुटलेली. ही सारी पात्रे येत्या काळात महाराष्ट्रातही भेटतील इतकी भीषण स्थिती समोर ठाकली आहे. शेतकरी डोळ्यातली आसवे रोखून सरकारकडे आशेने बघत आहे. जळालेले पीक, पाठीमागे लागलेला सावकारी तगादा आणि तोंडावर आलेले सण यात बळीराजाला सरकारच्या मदतीची अपेक्षा आहे. प्रशासकीय पंचनाम्यांच्या आणि अडकित्त्यात अडकवणाऱ्या नियमांच्या तांत्रिक कचाट्यात ही मदत अडकली, तर शेतकरी सैरभैर होतील आणि तो दिवस साऱ्या राज्यासाठी दुर्दैवी असेल. मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंत्रिमंडळ उपसमिती गठित करून मंत्र्यांना आणि आमदारांना थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाण्याचे आदेश दिले आहेत. ही देखील दिलासा देणारी बातमी आहे. पुढाऱ्यांच्या बांधावरच्या भेटी केवळ राजकीय ‘फोटोशूट’ किंवा कोरडा दिलासा देणाऱ्या ठरू नयेत. ड्राय फ्रूटसारखे प्रकार पुन्हा घडू नयेत. शासन-प्रशासनाने अत्यंत संवेदनशीलतेने ही परिस्थिती ‘आपत्ती’ म्हणून स्वीकारली पाहिजे. ‘एनडीआरएफ’च्या नियमांची वाट न पाहता, राज्य सरकारने आपल्या आपत्कालीन निधीतून थेट शेतकऱ्यांच्या खात्यात मदतीचे पैसे दसऱ्यापूर्वी जमा केले पाहिजे. शेतकऱ्यांची वीज बिले माफ करणे, पीक कर्जाचे पुनर्गठन करणे आणि तत्काळ नव्याने कर्ज उपलब्ध करून देणे या गोष्टी प्राधान्याने व्हायला हव्यात. सणांच्या काळात जर बळीराजाच्या घरात चुली पेटल्या नाहीत आणि त्याच्या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलले नाही, तर राज्याच्या प्रगतीचा आणि विकासाचा दावा निरर्थक ठरेल. बळीराजाला वाचवणे म्हणजे केवळ एका कुटुंबाला सावरणे नसते. हे राज्य कृषिप्रधान असेल तर तर शेतकरी या राज्याचा पाठीचा कणा आहे. तो शाबूत ठेवणे आवश्यक आहे. येणारा दसरा-दिवाळी त्यांच्यासाठी अश्रूंचा नाही, तर आशेचा आणि दिलाशाचा ठरावा, हीच या परिस्थितीत सरकारकडून एकमेव आणि प्रामाणिक अपेक्षा आहे. ■

## तंत्रवेध

# मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेवर एआयचा उतारा

**डॉ. दीपक शिकारपूर**

मानवी आयुष्यातील सर्वात मौल्यवान देणगी म्हणजे दृष्टी. मात्र वाढत्या वयानुसार अनेकांना मोतीबिंदूचा त्रास सुरू होतो. आज जगभरातील कोट्यवधी लोक मोतीबिंदूमुळे दृष्टिदोषाला सामोरे जात आहेत. भारतातही लाखो ज्येष्ठ नागरिक दरवर्षी मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया करून घेतात. आधुनिक तंत्रज्ञानामुळे ही शस्त्रक्रिया सुरक्षित, जलद व अत्यंत यशस्वी ठरली आहे. परंतु आता संशोधकांनी डोळ्यातील अशा औषधी थेंबांचा विकास करण्याच्या दिशेने महत्त्वाची पावले उचलली आहेत, जे मोतीबिंदू निर्माण करणाऱ्या प्रथिनांच्या गाठी कमी करण्यास मदत करू शकतात. प्रारंभिक मानवी चाचण्यांमध्ये त्याचे काही आशादायक परिणाम दिसून आले आहेत. वय वाढत असताना किंवा इतर कारणांमुळे ही प्रथिने एकमेकांना चिकटू लागतात. त्यामुळे भिंगाची पारदर्शकता कमी होते आणि मोतीबिंदू तयार होतो. अलिकडे झालेल्या प्रारंभिक वैद्यकीय अभ्यासामध्ये काही रुग्णांमध्ये दृष्टी सुधारल्याची आणि विरोधाभास ओळखण्याची क्षमता वाढल्याची नोंद झाली आहे.

आजच्या घडीला शस्त्रक्रिया हाच मोतीबिंदूवरील प्रमाणित आणि प्रभावी उपचार आहे. औषधी थेंबांचे संशोधन अत्यंत उत्साहवर्धक असले तरी अजून संशोधनाच्या टप्प्यात आहे. त्यामुळे कोणत्याही जाहिरातींना किंवा अप्रमाणित उपचारांना बळी पडू नये. हे संशोधन पुढे यशस्वी झाल्याचे परिणाम आरोग्य क्षेत्रासाठी क्रांतिकारक ठरू शकतात. प्रत्येक रुग्णापर्यंत शस्त्रक्रियेची सुविधा पोहोचविणे हे मोठे आव्हान आहे. अशा परिस्थितीत सुरक्षित, प्रभावी आणि परवडणारे औषधी उपचार उपलब्ध झाले, तर सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. आपल्या डोळ्यातील भिंग हे पूर्णपणे पारदर्शक असते. त्यामध्ये विशेष प्रकारची प्रथिने असतात. त्यांना वैज्ञानिक भाषेत ‘क्रिस्टलिन’ असे म्हटले जाते. ही प्रथिने अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने मांडलेली असल्यामुळे प्रकाश कोणत्याही अडथळ्याशिवाय डोळ्याच्या पडद्यापर्यंत पोहोचतो आणि आपल्याला स्पष्ट दिसते. वय वाढत असताना, मधुमेह, अतिनील किरणांचा दीर्घकाळ होणारा परिणाम, धूम्रपान, काही औषधांचा दीर्घकालीन वापर किंवा आनुवंशिक कारणांमुळे या प्रथिनांची रचना बदलू लागते. पूर्वी व्यवस्थित असलेली प्रथिने एकमेकांना चिकटू लागतात. सूक्ष्म गाठी तयार होतात आणि भिंगाची पारदर्शकता कमी होत जाते. याच प्रक्रियेला आपण मोतीबिंदू म्हणतो. ही प्रक्रिया अनेक वर्षे हळूहळू घडत असल्यामुळे सुरुवातीला रुग्णाला त्याची जाणीवही होत नाही. नव्या औषधी थेंबांमागील तंत्रज्ञान या प्रथिनांच्या सूक्ष्म पातळीवरील रचनेवर आधारित आहे. या थेंबांमध्ये अशी रासायनिक संयुगे विकसित केली जात आहेत जी प्रथिनांच्या गाठी कमी करण्यास, त्यांची मूळ रचना टिकवून ठेवण्यास किंवा पुन्हा अधिक सुव्यवस्थित करण्यास मदत करू शकतात. आता महासंगणक, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अणु-पातळीवरील संगणकीय प्रतिकृती यांच्या साहाय्याने लाखो संयुगांचे आभासी विश्लेषण काही दिवसांमध्ये करता येते.

भविष्यात प्रत्येक रुग्णाचा डोळा, त्याची अनुवंशिक माहिती, जीवनशैली, मधुमेहाची स्थिती आणि आरोग्यविषयक इतर माहिती कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे विश्लेषित करून कोणत्या व्यक्तीला औषधी थेंब उपयुक्त ठरतील आणि कोणाला थेट शस्त्रक्रियेची गरज आहे, हे अधिक अचूकपणे सांगता येईल. म्हणजेच सर्वांसाठी एकच उपचार न राहता प्रत्येक व्यक्तीसाठी वैयक्तिक उपचार योजना तयार होऊ शकते. यामध्ये नॅनो तंत्रज्ञानही महत्त्वाची भूमिका बजावत आहे. संशोधक आता सूक्ष्म नॅनो-कणांचा वापर करून औषध अधिक काळ डोळ्यात टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे औषध योग्य ठिकाणी अधिक प्रमाणात पोहोचेल आणि त्याची परिणामकारकता वाढू शकेल. हे तंत्रज्ञान पूर्णपणे यशस्वी झाले, तर भविष्यात डोळ्यांच्या अनेक विकारांवरील उपचारांची दिशा बदलू शकते. या संशोधनाकडे संपूर्ण जगातील नेत्रतज्ज्ञ, जैवतंत्रज्ञान कंपन्या, कृत्रिम बुद्धिमत्ता तज्ज्ञ आणि औषध निर्मिती उद्योग आशेने पाहत आहेत. कारण हे केवळ मोतीबिंदूवरील नवे औषध नाही, तर वैद्यकीय विज्ञान, जैवतंत्रज्ञान, नॅनोतंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या संगमातून निर्माण होत असलेल्या आरोग्यक्रांतीचे एक प्रभावी उदाहरण आहे. भविष्यात डॉक्टर, वैज्ञानिक आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांची ही त्रिसूत्री जगभरातील लाखो लोकांची दृष्टी वाचवण्यात मोलाची भूमिका बजावू शकते.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता डोळ्यांचे छायाचित्र पाहून मधुमेहजन्य रेटिनोपॅथी, काचबिंदू, मोतीबिंदू आणि इतर विकार ओळखण्यास मदत करत आहे. भविष्यात मोबाईलवर घेतलेल्या डोळ्यांच्या छायाचित्रांचे विश्लेषण करून रुग्णाला सुरुवातीच्या अवस्थेतच इशारा देणे शक्य होईल. त्यामुळे औषधोपचार सुरू करण्यासाठी योग्य वेळ निश्चित करता येईल. दूरवैद्यकीय सेवांमुळे ग्रामीण भारतातही मोठा बदल घडू शकतो. गावातील आरोग्य केंद्रातून डोळ्यांची तपासणी करून माहिती शहरातील नेत्रतज्ज्ञांपर्यंत काही क्षणांमध्ये पोहोचू शकते. कृत्रिम बुद्धिमत्ता प्राथमिक निदान करेल, तज्ज्ञ अंतिम निर्णय देतील आणि आवश्यक असल्यास औषध किंवा शस्त्रक्रिया सुचवतील. अशा डिजिटल आरोग्य व्यवस्थेमुळे उपचार अधिक जलद आणि सर्वसमावेशक होतील. औषधनिर्मिती क्षेत्रातही कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे संशोधनाचा वेग वाढला आहे. पूर्वी एखादे औषध विकसित होण्यासाठी अनेक वर्षे लागत असत. आता संगणकीय विश्लेषणामुळे हजारो रासायनिक संयुगांचे परीक्षण कमी वेळात करता येते. त्यामुळे नव्या औषधांच्या शोधाला मोठी गती मिळत आहे. मोतीबिंदूवरील संशोधनालाही याचा मोठा लाभ होत आहे. तथापि, नागरिकांनी समाजमाध्यमांवर किंवा इंटरनेटवर आढळणाऱ्या ‘शस्त्रक्रियेशिवाय मोतीबिंदू पूर्णपणे बरा करणारे थेंब’ अशा दाव्यांवर विश्वास ठेवू नये. संशोधनातील प्रत्येक यशस्वी प्रयोग म्हणजे अंतिम उपचार नसतो. तो पुढील प्रवासाची सुरुवात असते. आजघडीला शस्त्रक्रिया हाच सर्वोत्तम उपचार आहे; मात्र भविष्यात औषधी थेंब हे या त्रासाच्या सुरुवातीच्या अवस्थेतील रुग्णांसाठी प्रभावी पर्याय ठरू शकतात.

दृष्टी वाचवण्याच्या या नव्या प्रवासात विज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, जैवतंत्रज्ञान आणि वैद्यकीय संशोधन एकत्र येत आहेत. कदाचित पुढील दशकात ‘मोतीबिंदू म्हणजे फक्त शस्त्रक्रिया’ ही धारणा बदललेली असेल. तोपर्यंत वैज्ञानिक संशोधनावर विश्वास ठेवणे, तज्ज्ञांचा सल्ला घेणे आणि डोळ्यांची नियमित तपासणी करणे हेच आपल्या डोळ्यांसाठी सर्वात सुरक्षित आणि शहाणपणाचे पाऊल ठरेल. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## विशेष

# डिजिटल व्यवस्था; शाश्वततेकडे एक पाऊल

**सीए आरती कुळकर्णी**

भारताच्या डिजिटल क्रांतीतील सर्वात यशस्वी प्रयोगांपैकी एक म्हणजे युपीआय; आज अगदी चहाच्या टपरीपासून मोठ्या व्यावसायिक व्यवहारांपर्यंत आपल्या दैनंदिन आर्थिक व्यवहारांचा अविभाज्य भाग बनले आहे. मात्र, कोणतीही एवढी मोठी आणि २४×७ चालणारी डिजिटल व्यवस्था दीर्घकाळ पूर्णपणे विनाखर्च चालू शकत नाही. बँका आणि पेमेंट इको-सीस्टिमला तांत्रिक पायाभूत सुविधा, सेवा, सायबर सुरक्षा, फसवणूक प्रतिबंध, व्यवहार प्रक्रियेची माहिती, डिस्प्यूट रीसोलेशन आणि ग्राहक सेवेसाठी सातत्याने मोठा खर्च करावा लागतो. या पृष्ठभूमीवर मर्चंट डिस्काऊंट रेट (एमडीआर) कडे पाहणे आवश्यक आहे. एमडीआर म्हणजे सरकारकडून आकारला जाणारा कर नाही. हे डिजिटल पैशाच्या व्यवहाराशी संबंधित शुल्क असून त्यातून बँकिंग आणि पेमेंट इको-सीस्टिमला उत्पन्न मिळते. त्यामुळे एमडीआ म्हणजे सरकारच्या तिजोरीत जमा होणारा नवीन कर आहे, असा गैरसमज होऊ नये.

याचा सर्वसामान्य युपीआय वापरकर्त्यावर परिणाम होईल का, हा या चर्चेतील अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. सध्याच्या जाहीर रचनेनुसार दोन व्यक्तींमध्ये थेट होणारा व्यवहार होणारे युपीआय व्यवहार एमडीआरच्या कक्षेत येत नाहीत तसेच छोट्या मूल्याच्या मोठ्या प्रमाणातील मर्चंट व्यापारी व्यवहारावरही एमडीआय लागू होत नाही. त्यामुळे रोजच्या जीवनातील मित्राला किंवा कुटुंबीयाला पैसे पाठवणे तसेच मोठ्या प्रमाणातील लहान युपीआय पेमेंटवर या बदलाचा थेट परिणाम होणार नाही. म्हणजेच नवीन एमडीआरमुळे प्रत्येक युपीआय ट्रान्ससेक्शन महाग होणार आहे किंवा प्रत्येक ग्राहकाला युपीआय वापरण्यासाठी शुल्क भरावे लागणार आहे, असा अर्थ काढणे योग्य नाही. सध्याच्या रचनेनुसार एमडीआरच्या कक्षेत येणाऱ्या व्यवहारांचे प्रमाण तुलनेने मर्यादित असल्यामुळे प्रत्यक्ष प्रभाव तुलनेने कमी व्यवहारांवर आणि संबंधित व्यापाऱ्यावर केंद्रित राहण्याची अपेक्षा आहे. आतापर्यंत झिरो-एमडीआर युपीआय व्यवस्था टिकवण्यासाठी केंद्र सरकारने विविध काळात बँक्स आणि पेमेंट इको-सीस्टिमसाठी इंसेन्टिव्ह स्किम्स म्हणजेच प्रोत्साहन योजनेद्वारे आर्थिक सहाय्य केले आहे. म्हणजे युपीआय वापरकर्त्याला व्यवहार मोफत वाटत असला, तरी त्या संपूर्ण व्यवस्थेचा खर्च शून्य नसतो. त्यामुळे योग्य आणि मर्यादित एमडीआरमुळे युपीआय इको-सीस्टिमची सरकारी अनुदान/योजनांवरील अवलंबित्व काही प्रमाणात कमी होऊन व्यवस्था अधिक आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होऊ शकते.



याचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे बँका आणि पेमेंट सेवा पुरवठादारांना तंत्रज्ञान सुधारणा, मजबूत सायबर सुरक्षा, फसवणुकीचा शोध, डेटा संरक्षण आणि सेवेची गुणवत्ता यामध्ये अधिक गुंतवणूक करण्यासाठी स्वतंत्र उत्पनाचे स्रोत उपलब्ध होऊ शकतात. युपीआयने रोख पैशांच्या व्यवस्थापनावरचा खर्च कमी केला, व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणली, व्यापाऱ्यांना तत्काळ पैसे उपलब्ध करून दिले आणि लेखाकरण तसेच सलोखा सुलभ केला. त्यामुळे युपीआय ही केवळ पेमेन्ट सुविधा राहिलेली नसून आज ती देशाची अत्यावश्यक डिजिटल आर्थिक पायाभूत सुविधाही बनली आहे. अर्थात एमडीआर ठरवताना एक संतुलन आवश्यक आहे. छोट्या व्यापाऱ्यांवर अनावश्यक आर्थिक भार पडू नये, सामान्य ग्राहकांसाठी युपीआय सहज आणि परवडणारे राहावे; त्याचवेळी बँकिंग व पेमेंट इको-सीस्टिम आर्थिकदृष्ट्या सक्षम राहावे ही तीनही उद्दिष्टे महत्त्वाची आहेत.

माझ्या मते प्रश्न केवळ ‘युपीआयवर शुल्क का’ असा नसावा. खरा प्रश्न असा असायला हवा- ‘जगातील सर्वात मोठ्या डिजिटल देयक प्रणालींपैकी एक असलेली युपीआय व्यवस्था सुरक्षित, सक्षम, नावीन्यपूर्ण आणि आर्थिकदृष्ट्या शाश्वत कशी ठेवायची?’ योग्य मर्यादेत आणि निवडक व्यवहारांवर आकारला जाणारा एमडीआर हा त्या दिशेने एक व्यवहार्य आर्थिक पर्याय ठरू शकतो. युपीआय ही केवळ मोफत सुविधा नसून देशाची डिजिटल आर्थिक पायाभूत सुविधा आहे आणि मजबूत पायाभूत सुविधेसाठी शाश्वत महसूल मॉडेल तितकेच आवश्यक आहे. ■

## दिल्ली वार्तापत्र

# राज्यसभा निवडणूक आणि उत्तरप्रदेश

**श्यामकांत जहागीरदार**

राज्यसभेच्या ११ जागांसाठीच्या निवडणूक कार्यक्रमाची निवडणूक आयोगाने मंगळवारी घोषणा केली. यात सर्वाधिक १० जागा या उत्तरप्रदेशातील आहेत, उत्तराखंडच्या एका जागेसाठीही निवडणूक होणार आहे तर पश्चिम बंगालमधील एका जागेसाठी पोटनिवडणुकीची घोषणाही आयोगाने केली आहे. १६ ऑक्टोबरला या जागांसाठी मतदान होणार आहे. २९ सप्टेंबरला या निवडणुकीची अधिसूचना जारी होणार असून ६ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरायचे आहेत.

उत्तरप्रदेशात येत्या काही महिन्यांत विधानसभा निवडणूक होणार आहे. त्यामुळे त्याच्या आधी होत असलेल्या या राज्यसभा निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागणे स्वाभाविक आहे. उत्तरप्रदेशच्या १० जागांचा विचार केला तर यातील ८ जागा सध्या भाजपाकडे आहेत, तर सपा आणि बसपाकडे प्रत्येकी एक जागा आहे. निवडणूक होत असलेल्या दहापैकी भाजपा ८ जागा जिंकण्याची शक्यता आहे, तर समाजवादी पक्षाला दोन जागा मिळू शकतात.

उत्तरप्रदेशातून भाजपाच्या ज्या आठ जागा रिकाम्या होत आहे, त्यात केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी, अरुण सिंह, नीरज शेखर, बृजलाल वर्मा, गीता शाक्य, बी. एल. वर्मा, सीमा द्विवेदी आणि दिनेश शर्मा यांचा समावेश आहे. नीरज शेखर माजी पंतप्रधान चंद्रशेखर यांचे पुत्र आहेत, तर बृजलाल वर्मा उत्तरप्रदेशचे माजी पोलिस महासंचालक आहेत. अंदमान निकोबारच्या नायब राज्यपालपदी नियुक्ती झाल्यामुळे या वर्षीच्या सुरुवातीला दिनेश शर्मा यांनी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. दिनेश शर्मा उत्तरप्रदेशचे माजी उपमुख्यमंत्री होते. २०२० मध्ये या १० जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपाचे आठ उमेदवार तसेच सपाचे रामगोपाल यादव आणि बसपाचे रामजी गौतम अविरोध विजयी झाले होते.

रामजी गौतम यांचा कार्यकाळ संपत आल्यामुळे बसपाचे आता लोकसभा, राज्यसभा आणि उत्तरप्रदेश विधानसभेतील प्रतिनिधित्व शून्यावर आले आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत बसपाचा एकही खासदार विजयी झाला नव्हता. राज्यसभेत बसपाचे रामजी गौतम हे एकमेव सदस्य होते. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत उमाशंकरसिंह हे बसपाचे एकमात्र आमदार विजयी झाले होते. मात्र ऑगस्ट महिन्यात त्यांचे निधन झाल्यामुळे उत्तरप्रदेश विधानसभेतही सध्या बसपाचा एकही सदस्य उरला नाही. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री असलेले हरदीपसिंग पुरी यांचा राज्यसभा सदस्य म्हणून कार्यकाळही संपत आहे. पुरी यांना भाजपाने उत्तरप्रदेशातून उमेदवारी दिली तर त्यांचे मंत्रिपद कायम राहील. मात्र कोणत्याही कारणाने त्यांना उमेदवारी मिळाली नाही तर त्यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागेल. ४०३ सदस्यांच्या उत्तरप्रदेश विधानसभेत सध्या ६ जागा रिक्त आहेत, कारण विधानसभेच्या ६ आमदारांचे निधन झाले आहे. त्यामुळे विधानसभेचे संख्याबळ ३९७ आहे. यात भाजपाचे २५६ आमदार आहेत. अपना दल सोनोवालचे १३, राष्ट्रीय लोकदलाचे ९, सुभासपाचे ६ तर निषाद पक्षाचे ५ सदस्य आहेत. अपक्ष मिळून भाजपा आघाडीचे संख्याबळ २९० वर जाते. सपा-काँग्रेस आघाडीजवळ १०३ आमदार आहेत. यात सपाच्या १०१ आणि काँग्रेसच्या २ आमदारांचा समावेश आहे.

राज्यसभेची एक जागा जिंकण्यासाठी राज्यात ३७ मतांची आवश्यकता आहे. संख्याबळाचा विचार करता भाजपा सात जागा सहज जिंकू शकतो, तर सपा-काँग्रेस आघाडीला दोन जागा मिळू शकतात. भाजपाजवळ ३१ अतिरिक्त मते आहेत, तर सपा-काँग्रेस आघाडीजवळ २९. म्हणजे आठवी जागा जिंकण्यासाठी भाजपाला ६ अतिरिक्त मतांची तर सपा काँग्रेस आघाडीला ८ अतिरिक्त मतांची आवश्यकता आहे. त्यामुळे राज्यात दहावी जागा कोण जिंकणार, याबाबत उत्सुकता वाढली आहे.

उत्तराखंडमध्ये भाजपाचे नरेश बन्सल यांचा कार्यकाळ संपत आल्यामुळे निवडणूक होत आहे. राज्यातील संख्याबळाचा विचार करता भाजपा ही जागा सहज जिंकू शकते. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या अभिनेत्री रुक्मिणी मल्लिक यांच्या राजीनाम्यामुळे राज्यात राज्यसभेची निवडणूक होत आहे. पश्चिम बंगालमधील जागा भाजपा जिंकणार असल्यामुळे यावेळी राज्यसभेत भाजपाचे संख्याबळ एकने वाढणार आहे. म्हणजे सपा आणि भाजपा यांचीच प्रत्येकी एक जागा यावेळी वाढू शकते. भाजपाने आपल्या उमेदवारांच्या नावांची घोषणा केली नाही. रामगोपाल यादव हे सपाचे सर्वेसर्वा अखिलेश यादव यांचे काका आहेत. त्यामुळे सपा आपल्या दोनपैकी एका जागेवर रामगोपाल यादव यांना पुन्हा राज्यसभेत पाठवू शकते. सपाने रामगोपाल यादव यांना यावेळी राज्यसभेची उमेदवारी दिली तर त्याचा हा सहावा कार्यकाळ असणार आहे. १९९२ मध्ये यादव पहिल्यांदा राज्यसभेवर निवडून आले, १९९८ मध्ये त्यांना राज्यसभेवर दुसऱ्यांदा पाठवण्यात आले. २००४ मध्ये राज्यसभा सदस्य म्हणून कार्यकाळ संपल्यानंतर यादव यांनी संभलमधून लोकसभेची निवडणूक लढवली आणि जिंकली. २००८ पर्यंत ते लोकसभेत होते. २००८ मध्ये लोकसभेचा राजीनामा देत यादव तिसऱ्यांदा राज्यसभेवर गेले. तेव्हापासून म्हणजे सलग १८ वर्षांपासून ते राज्यसभेत आहेत. भाजपा माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांना यावेळी उत्तरप्रदेशातून राज्यसभेवर पाठवणार का, याबाबत उत्सुकता आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत अमेठीत पराभव झाल्यानंतर इराणी राजकारणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर गेल्या होत्या. जवळपास दोन वर्ष त्या राजकारणात सक्रिय नव्हत्या. या काळात त्या छोट्या पडद्यावर परतल्या होत्या. दोन महिन्यांपूर्वी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या कार्यकारिणीत राष्ट्रीय महासचिव म्हणून त्यांचा समावेश झाला होता. त्यामुळे आता भाजपा त्यांना राज्यसभेवर पाठवणार का, याकडे सर्वांचे लक्ष राहणार आहे.

विशेष म्हणजे २०११ ते २०१९ या काळात स्मृती इराणी भाजपाच्या राज्यसभा सदस्य होत्या. राज्यसभेच्या सदस्य असतानाच भाजपाने त्यांना २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत अमेठीतून राहुल गांधी यांच्याविरोधात उमेदवारी दिली होती. या निवडणुकीत इराणी यांनी राहुल गांधी यांचा पराभव करत इतिहास घडवला होता. राज्यसभेची विद्यमान सदस्यसंख्या २४३ आहे, यात ११६ जागांसह भाजपा सर्वात मोठा पक्ष आहे. रालोआतील मित्रपक्ष पकडून भाजपा १५० आकडा ओलांडतो. मात्र राज्यसभेत दोनतृतीयांश बहुमतापासून भाजपा अजूनही थोडा दूर आहे. ३० जागांसह काँग्रेस दुसऱ्या स्थानावर आहे. काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडीजवळ सध्या ६४ सदस्य आहेत. द्रमुकचे ८ तर आपचे तीन सदस्य इंडिया आघाडीतून बाहेर पडले आहेत. त्यामुळे इंडिया आघाडीलाही धक्का बसला आहे.

राज्यसभेच्या यावेळच्या निवडणुकीत फारसा राजकीय चमत्कार होण्याची शक्यता नसली तरी काही महिन्यांनी होणाऱ्या उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीची रंगीत तालीम म्हणून या निवडणुकीकडे पाहिले जाणार आहे. त्यामुळे यावेळची निवडणूक भाजपा आणि समाजवादी पक्ष या दोन पक्षांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. ■

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### सामान्यांची व्यथा ऐकणारा समन्वयक असावा

लोकशाही व्यवस्थेत लोकप्रतिनिधी आणि सामान्य नागरिक यांच्यामधील दुवा म्हणून समन्वयकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. सामान्य माणसाची समस्या केवळ ऐकून घेणे पुरेसे नसते ती समस्या योग्य ठिकाणी मांडणे, संबंधित प्रशासनाशी समन्वय साधणे आणि तिच्या पाठपुराव्याची माहिती नागरिकाला देणे, ही खरी समन्वयकाची जबाबदारी आहे. सामान्य नागरिकाला शासकीय कार्यालयातील प्रक्रिया, नियम आणि कागद अशावेळी समन्वयकाने नागरिकाची अडचण समजून घेऊन संबंधित विभागापर्यंत ती पोहोचवावी. रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण, महसूल, पोलिस किंवा इतर समस्या आणि उपाय शासकीय प्रश्न योग्य अधिकाऱ्यापर्यंत योग्य पद्धतीने पोहोचवणे आणि त्याचा पाठपुरावा करणे, हे समन्वयकाचे काम असावे. राजकीय क्षेत्रातही समन्वयक हा केवळ संदेश पोहोचवणारा माणूस नसून जनतेचा आवाज लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचवणारा दुवा असतो. मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या, स्थानिक कार्यकर्त्यांच्या सूचना आणि सामाजिक प्रश्न यांची वस्तुनिष्ठ माहिती लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचविल्यास निर्णयप्रक्रियेला योग्य दिशा मिळू शकते.

समन्वयकाकडे प्रशासनाची माहिती असण्याबरोबरच समाजातील विविध घटकांच्या अडचणी समजून घेण्याची संवेदनशीलता असणे आवश्यक आहे. गरीब, शेतकरी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, कामगार किंवा गरजू कुटुंब प्रत्येकाची समस्या महत्त्वाची आहे. समस्या लहान-मोठी न मानता माणूस महत्त्वाचा मानणे, हीच सामाजिक बांधिलकी आहे. ऐकणे, जोडणे आणि सोडविण्यासाठी प्रयत्न करणे आज सामान्य माणसाला सर्वात जास्त गरज आहे ती ऐकून घेणाऱ्या व्यक्तीची. प्रत्येक प्रश्न तत्काळ सुटेलच असे नाही. मात्र नागरिकाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, योग्य मार्गदर्शन करणे आणि प्रामाणिकपणे पाठपुरावा करणे यामुळे व्यवस्थेवरील विश्वास वाढतो. खरा समन्वयक तोच जो सत्तेच्या जवळ असूनही सामान्य माणसापासून दूर जात नाही, प्रशासनाशी संवाद साधतो, लोकप्रतिनिधींशी समन्वय करतो आणि समाजातील शेवटच्या घटकाची व्यथा संबंधित यंत्रणेपर्यंत पोहोचवतो. कारण पद मोठे असण्यापेक्षा जबाबदारी मोठी असणे आणि सामान्यांच्या प्रश्नांसाठी संवेदनशील राहणे, हीच खऱ्या समन्वयकाची ओळख आहे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

■■■

### एनएसएस : विद्यार्थ्यांना समाजसेवेशी जोडणारी

विद्यार्थी जीवन हे ज्ञान मिळवण्याबरोबरच समाजाशी जोडले जाण्याचेही महत्त्वाचे पर्व आहे. विद्यार्थी हा देशाचा भावी नागरिक असतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शिक्षणाबरोबरच समाजसेवेची जाणीव असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, शिस्त, सहकार्य आणि जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) महत्त्वाची भूमिका बजावते. राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात भारत सरकारने २४ सप्टेंबर १९६९ मध्ये केली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, रक्तदान शिबिरे, आरोग्यविषयक जनजागृती, ग्रामविकास, पर्यावरणसंवर्धन आणि आपत्तीच्या काळातील मदत अशा विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थी सहभागी होतात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना, नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव विकसित होते.

राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांना मी पेक्षा आपण या विचाराकडे घेऊन जाते. समाजाच्या गरजा ओळखून निःस्वार्थपणे सेवा करणे, पर्यावरणाचे रक्षण करणे आणि सामाजिक ऐक्य वाढवणे यामुळे राष्ट्राच्या प्रगतीला हातभार लागतो. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आपण समाजासाठी कार्य करूया, परस्परांना साथ देऊया आणि देशाच्या विकासात आपला खारीचा वाटा उचलूया. स्वतःसाठी नव्हे, तर समाजासाठी आणि राष्ट्रासाठी या भावनेने प्रेरित होऊन आपण एक सशक्त, समृद्ध आणि समर्पित भारत घडवूया.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### फटाक्यांचा आवाज नकोच

‘सार्वजनिक स्थळी फटाक्यांवर बंदी’ ही तरुण भारतातील बातमी वाचली. डीजे, लेझर लाईटच्या दुष्परिणामांनामुळे या वर्षी बऱ्याच ठिकाणी असंख्य जनतेच्या भावना लक्षात घेऊन बऱ्यापैकी अंकुश लागल्याचे चित्र आहे. आता उच्च न्यायालयाने सार्वजनिक ठिकाणी फटाक्यांवरही बंदीचे आदेश दिले आहेत हे नक्कीच स्वागतार्ह आहे. कानठळ्या बसणारे फटाके, धूर यामुळेही कान, डोळे, फुफ्फुसावर परिणाम होतोच आणि विशेषतः ज्येष्ठ आणि रुग्णांना. फटाक्यांच्या बाबतीत तर लग्न समारंभात देखील काही ठिकाणी अतिरेक होतो आणि त्याशिवाय जणू लग्नसमारंभ होऊच शकत नाही अशी धारणा असणारे अनेक लोक आहेत. तसेच लग्न कार्यालय असणाऱ्या जवळपासच्या वसाहतीतील नागरिकांना लग्नाच्या मौसमात बराच उपद्रव सहन करावा लागतो. या अशा प्रकारच्या फटाक्यांच्या आनंदोत्सवावरही यंत्रणा अंकुश लावतील अशी अपेक्षा ठेवू या. ■

**राम राजे**/९४२१७७९९४५

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अधिकच्या आणि भरीव मदतीसाठी पाठपुरावा करणार : आ. अभिमन्यू पवार

तभा वृत्तसेवा

औसा दि. २४ सप्टेंबर : अपुरा पाऊस आणि प्रतिकूल हवामानामुळे खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या औसा विधानसभा मतदारसंघातील निलंगा तालुक्यातील पिकांची आमदार अभिमन्यू पवार यांनी पाहणी दौरा केला.त्यावेळी एकोजी-मुदगड, सरवडी, मदनसुरी, हरीजवळगा, हासुरी बु., कासार सिरसी आणि मिरगण हळ्ळी परिसरातील गावांतील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. शेतकऱ्यांना धीर देत सरकारकडून मिळणाऱ्या सरसकट मदतीची भुमिका स्पष्ट करून अधिकच्या आणि भरीव मदतीसाठी पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही आ. अभिमन्यू पवार यांनी शेतकऱ्यांना दिली.

या पीक पाहणीत पावसाअभावी सोयाबीन, उडीद,मुग , तूर पिकांची झालेली दयनीय अवस्था, उत्पादनात झालेली घट तसेच वाढलेल्या आर्थिक अडचणींबाबत शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा मांडल्या. आमदार अभिमन्यू पवार यांनी नुकसानग्रस्त पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांना धीर दिला.व मदत केवळ पंचनाम्यांपुरती मर्यादित राहणार नाही.शेतर्कयांचे नुकसान मोठ्या प्रमाणात सरसकट झाले असून शेतकऱ्यांना सरसकट मदत सरकार करणार आहे. असे आमदार पवार यांनी सांगितले.



# विविध वृत्त.....

## विद्यार्थी म्हणून ज्या शाळेत घडलो, आज त्याच शाळेत मार्गदर्शक म्हणून उभा राहिलो!



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ सप्टेंबर : ज्या शाळेच्या अंगणात शिक्षणाचे धडे घेतले, संस्कार मिळवले आणि स्वप्नांना दिशा मिळाली, त्याच डरलरीरींळ त्र्श्रेलरश्र डलहेश्र मध्ये आज विद्यार्थी म्हणून नव्हे, तर सायबर सुरक्षा जनजागृती करणारा मार्गदर्शक म्हणून उभे राहण्याचा अभिमानास्पद क्षण अनुभवायला मिळाला.

टींळलज्ञ क्शरश्र र्ड्ढीपवरींळेप आणि ठरक्षीळीहळ डहरर्हीं चरहर्हीेंळवूरश्रूर यांच्या माध्यमातून जाधव साहिल आणि कृष्णा पांढरे यांनी डरलरीरींळ त्र्श्रेलरश्र डलहेश्र येथे विद्यार्थ्यांसाठी विशेष सायबर सुरक्षा जनजागृती सत्र घेतले. या सत्रामध्ये ऑनलाइन फसवणूक, जढझ व पासवर्ड सुरक्षा, बनावट लिंक व वेबसाइट्स, सोशल मीडिया सुरक्षितता, डिजिटल पेमेंटमधील सावधगिरी, वैयक्तिक माहितीचे संरक्षण तसेच सायबर गुन्हा घडल्यास घ्यावयाची तातडीची काळजी अशा विविध महत्त्वपूर्ण विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारत सत्राला चांगला प्रतिसाद दिला.

## एक चुकीचा क्लिक, मोठा धोका!
### शास्त्री विद्यालयात विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचा कानमंत्र



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ सप्टेंबर : येथील राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती उपक्रमांतर्गत श्री लालबहादूर शास्त्री विद्यालय, खडगाव रोड, लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.

या सत्रात सायबर वॉरिअर नरेश पंडित, अविष्कार कांबळे, प्राची भोसले व गायत्री मायकर यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणूक, संशयास्पद लिंक, ओटीपी सुरक्षितता, मजबूत पासवर्ड, सोशल मीडिया सुरक्षा, वैयक्तिक माहितीचे संरक्षण तसेच मोबाईल व इंटरनेटचा सुरक्षित वापर याबाबत मार्गदर्शन केले.

सायबर फसवणुकीच्या विविध पद्धतींची उदाहरणांसह माहिती देत अनोळखी लिंकवर क्लिक करण्यापूर्वी विचार करणे, कोणालाही ओटीपी व वैयक्तिक माहिती शेअर न करणे तसेच ऑनलाइन व्यवहार करताना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले. ऑनलाइन फसवणूक झाल्यास राष्ट्रीय सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० वर त्वरित संपर्क साधण्याबाबतही माहिती देण्यात आली.

यावेळी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक लहाने सौदागर व प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक वळसने व्ही. बी. यांची उपस्थिती लाभली. शिक्षकवृंदाच्या सहकार्याने सत्र उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून सायबर सुरक्षेबाबतच्या शंकांचे निरसन करून घेतले.

# गणेश विसर्जन मिरवणुकीत वीज यंत्रणेपासून सावधगिरी बाळगा
# झेंडे, पताकांना स्टील रॉड वापरणे टाळा : महावितरणचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.२४ सप्टेंबर: गणेशोत्सवानिमित्त सर्वत्र विसर्जन मिरवणुकीचा उत्साह ओसंडून वाहत असताना, नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महावितरणने महत्त्वाचे आवाहन केले आहे. मिरवणुकीदरम्यान वीजवाहिन्या, विद्युत खांब तसेच ट्रान्सफॉर्मर आदी वीज यंत्रणेजवळून जाताना विशेष दक्षता घेण्याची सूचना देण्यात आली आहे. शुक्रवारीलाडक्या बाप्पाला निरोप देताना भाविकांचा आनंद ओसंडून वाहत असतानाच मनहीभरून येणार आहे. उत्साहाच्या भरात गणेश मंडळांच्यापदाधिकाऱ्यांकडून कोणताही निष्काळजीपणा होता कामा नये, यासाठी महावितरणने हे आवाहन केले आहे.

गणेशोत्सवात शहर तसेच ग्रामीण परिसरात मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात विघ्नहर्त्या गणरायाचीस्थापना करण्यात आली होती. त्यासाठी गणेश मंडळांना सर्वतोपरी सुविधा उपलब्ध देण्याकामी महावितरण तसेच पोलीस प्रशासनाने सहकार्य केले आहे. अत्यंत धार्मिक आणि भक्तीमय वातावरणात हा उत्सव साजरा करण्यात आला. शुक्रवारी अनंत चतुर्दशीदिवशी श्रीगणेश विसर्जन आहे. त्यासाठी गणेश मंडळांनीहीजय्यत तयारी केली असून पोलीस प्रशासनानेही शांततेच्या वातावरणात श्रीगणेश विसर्जन सोहळा पार पाडण्याचे आवाहन केले आहे. शहराच्या विविध भागातूनगणेश मंडळांच्यामिरवणुका जातात. अनेक ठिकाणी विजेच्या तारा मिरवणुकीमध्ये बाधा ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी अशा तारा हलविण्यासाठी भाविक भक्त लोखंडी रोडचा वापर करू शकतात. तेव्हा अनावधानाने एखादी दुर्घटना होऊ शकते. त्यामुळे




महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले की, मिरवणुकीदरम्यान उंचावलेले रथ, सजावट केलेले मंडप, झेंडे वा पताका यांचा संपर्क वीज वाहिन्यांशी आल्यास अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे मंडळांनी मिरवणुकीच्या मार्गा दरम्यान वीज वाहिन्या आणि विद्युत उपकरणांपासून आवश्यक तेवढे अंतर ठेवणे गरजेचे आहे. नागरिकांनी तसेच मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी बाबींची विशेष काळजी घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे:श्री गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत उंच फलक, झेंडे, रथ वा सजावट अशा उपकरणांचा वापर करताना विद्युत वाहिन्यांपासून अंतर ठेवावे.झेंडे, पताका यांना शक्यतो स्टीलचे रॉड वापरले जातात. स्टील हे वीजवाहक असल्याने प्रसंगी प्राणांतिक अपघात होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे स्टील रॉडच्या ऐवजी लाकडी अथवा पीव्हीसी पाईप वापरावेत. ट्रान्सफॉर्मरजवळ, ओपन वीज तारा वा विद्युत यंत्रणेवर फटाके फोडू नयेत. कुठेही तारा तुटलेले किंवा पडलेले दिसल्यास लगेच महावितरणच्या आपत्कालीन २४ तास उपलब्ध असलेले १९१२ किंवा १८००२१२३४३५ किंवा १८००२३३३४३५ या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा स्थानिक महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा.आपला थोडासा जागरूकपणा अनेकांचे प्राण वाचवू शकतो. विद्युत अपघात टाळून सुरक्षित व आनंदी वातावरणात उत्सव पार पाडणे हेच सर्वांचे ध्येय असावे. नागरिकांनी आनंदाच्या उत्सवाबरोबरच सुरक्षिततेचाही विचार करून विसर्जन मिरवणुक सुरक्षित पार पाडावी, असे विशेष आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

# ऊसासाठी होणारा बेसुमार पाणी उपसा तात्काळ थांबवून
# जिल्ह्यातील भूजल व पिण्याचे पाणी आरक्षित करा दयानंद पाटील यांची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ सप्टेंबर : गाळप हंगाम संपल्यानंतरहीऊसासाठी होणारा बेसुमार पाणी उपसा तात्काळ थांबवून संभाव्य भीषण दुष्काळाच्या पार्श्र्वभूमीवरलातूर जिल्ह्यातील भूजल व पिण्याचे पाणी आरक्षित करण्याची मागणीशिवा लिंगायत युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दयानंद पाटील यांनी एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

साखर कारखान्यांचा हंगाम संपला असला तरी शेतातील उसाला दिल्या जाणाऱ्या भूगर्भातील पाण्याच्या अनिर्बंध वापरावर प्रशासनाने तात्काळ कठोर मर्यादा किंवा पूर्ण बंदी आणावी. ते पाणी पिण्यासाठी आरक्षित करावे.मराठवाडा दुष्काळमुक्तीसाठी ऊस शेतीबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा. अथांग पाणी लागणारी उसाची शेती मराठवाड्याच्या भूगर्भाला पोखरत असल्याने, येथील ऊस लागवडीचे क्षेत्र टप्प्याटप्प्याने कमी करण्यासाठी शासनाने कायमस्वरूपी धोरण आखावे. शेतकऱ्यांनी कमी पाण्यात येणारी कडधान्ये, तेलबिया आणि फळबागांकडे वळावे यासाठी शासनाने विशेष आर्थिक प्रोत्साहन व अनुदान पॅकेज जाहीर करावे.१००% ठिबक सिंचन सक्तीः जिल्ह्यातील शिल्लक असलेल्या सर्व उसाच्या शेतीला केवळ आणि केवळ ठिबक सिंचन (ऊीळ खींीळसरींळेप) वापरण्याची सक्ती प्रशासनाने करावी व पूर सिंचनावर गुन्हे दाखल करावेत.लातूर व धाराशिव जिल्ह्यांतील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन प्रशासनाने तातडीने कठोर उपाययोजना कराव्यात, ही नम्र विनंती.

जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात दयानंद पाटील यांनी असे म्हटले आहे की, लातूर जिल्हा यावर्षी संभाव्य भीषण दुष्काळाच्या सावटाखाली आहे. अनेक भागात आतापासूनच पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. पावसाअभावी खरीप हंगामही शेतकऱ्यांच्या हातूनगेला आहे.

चालू वर्षात लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये अत्यंत अल्प पाऊस झाला असून, परिस्थिती १९७२ च्या ऐतिहासिक दुष्काळापेक्षाही अधिक भीषण व भयावह बनली आहे. आजघडीलाच जिल्ह्यातील विहिरी आणि कूपनलिका (बोअरवेल) पूर्णपणे कोरड्या पडल्या आहेत. लातूर शहरातील व ग्रामीण भागातील सामान्य नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी ८ ते १० दिवस चातकासारखी वाट पाहावी लागत आहे.परिस्थिती इतकी गंभीर असताना, दुसरीकडे साखर कारखान्यांचा गाळप हंगाम संपूनही शेतातील उभा ऊस जगवण्यासाठी भूजलाचा आणि उपलब्ध पाण्याचा बेसुमार उपसा अहोरात्र सुरू आहे. एका बाजूला जनता पिण्याच्या पाण्याच्या थेंबाथेंबासाठी वणवण भटकत असताना, उसासारख्या जास्त पाणी लागणाऱ्या नगदी पिकासाठी जमिनीच्या गर्भातून पाण्याचा असा अनिर्बंध उपसा होणे, हे मानवनिर्मित संकट अधिक गडद करणारे आहे. जर हा पाण्याचा अपव्यय आत्ताच थांबवला नाही, तर आगामी कडक उन्हाळ्यात लातूरकरांवर पाण्याचे अभूतपूर्व संकट ओढवेल आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा हक्क हा सर्वोच्च मानून 'शिवा लिंगायत युवक संघटना' प्रशासनाकडे खालील मागण्या तातडीने मांडत आहे.

## 'श्रीगणेशा आरोग्याचा' अभियानांतर्गत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी




तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २४ सप्टेंबर : धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज व चॅरिटेबल हॉस्पिटल, उदगीर यांच्या वतीने 'श्रीगणेशा आरोग्याचा' या अभियानांतर्गत जीवन विकास निवासी मतिमंद कर्मशाळेतील सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांची तसेच कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांच्या विविध आरोग्यविषयक तक्रारी व आजारांची तपासणी करून आवश्यकतेनुसार औषधोपचार व आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेत सर्व आवश्यक उपचार यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वेळेवर आरोग्यसेवा व उपचार मिळाल्याने संस्थेच्या वतीने वरिष्ठ प्राध्यापक डॉ. चांदेगावकर पाटील, डॉ. चंदावाड चेतन, डॉ. पांडे गणेश, डॉ. अजय पाटील, डॉ. विष्णुकांत पाटील, डॉ. नरसिंह पाटील व धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज व चॅरिटेबल हॉस्पिटलच्या पदाधिकाऱ्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. याप्रसंगी अधीक्षक अब्दुलमलिक राजापटेल, निदेशक सय्यद साजिद, शेख रूहूलइसलाम, जागीरदार चव्हाण, नागरवाड यादव, भंडरवार अंकुश आदी कर्मचारी उपस्थित राहून कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले

## नृसिंह गणेश मंडळाच्या वेलनेस शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



तभा वृतसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २४ सप्टेंबर : गणेशोत्सवाच्या निमित्ताने धार्मिक उपक्रमांसोबत सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांना प्रोत्साहन देत येथील नृसिंह गणेश मंडळाच्या वतीने वेलनेस शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ५७ नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला.

शिबिरात नागरिकांचे शरीर रचना विश्र्लेषण (इेवू -परश्रीूळी ठर्शोीीं) करून शरीरातील चरबीचे प्रमाण, स्नायूंचे प्रमाण यासह विविध बाबींची माहिती देण्यात आली. दैनंदिन जीवनात आरोग्याची काळजी कशी घ्यावी, स्वयंपाकघरातील आहाराचे योग्य नियोजन कसे करावे आणि नियमित व्यायामाचे महत्त्व याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

आरोग्य सल्लागार रुद्राक्षा लालासाहेब तट व सोनिया कृष्णा माळी यांनी उपस्थितांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन महादेव सुगावे यांनी केले.

यावेळी नृसिंह गणेश मंडळाचे अध्यक्ष यश दुरुगकर, संदिप धुमाळे, बस्वराज पुजारी, अविनाश सुगावे, विद्यासागर येरोळे, आत्मलिंग पुजारी, गुरुबास सुगावे, त्र्यंबक तोंडारे, धोंडीराम काळगे, अनिल तोंडारे, शंकर तोंडारे, किरण येरोळे, सचिन दुरुगकर, वैभव तोंडारे, नरसिंग येरोळे, समर्थ मनगुरे, गुरु स्वामी, शालूबाई धुमाळे, शिवनंदा सुगावे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

## राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने आसिफ देशमुख यांचा गौरव
### खा. डॉ. काळगे, आ. काळे यांच्या हस्ते सन्मान; शैक्षणिक व सामाजिक कार्याची राज्यस्तरावर दखल



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २४ सप्टेंबर : रहेमानिया तालीमी सोसायटी, निलंगा अंतर्गत गुलशन-ए-अतफाल उर्दू प्राथमिक शाळेचे सहशिक्षक आसिफ हाफिज मियां देशमुख यांना महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने प्रदान करण्यात येणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार खासदार डॉ. शिवाजीराव काळगे आणि शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी सोबत सहशिक्षक आसिफ देशमुख यांच्या पत्नीसह कुटुंबातील अनेक सदस्य उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले योगदान, प्रभावी अध्यापन आणि सामाजिक बांधिलकीची राज्यस्तरावर दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

लातूर येथील कॉक्सेट कॉलेजमध्ये झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात हा गौरव करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून असलेली ओळख तसेच अनाथ आणि दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन देशमुख यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. देशमुख यांना मिळालेल्या या प्रतिष्ठित सन्मानाबद्दल रहेमानिया तालीमी सोसायटीचे अध्यक्ष हाजी मंजूर अहमद देशमुख, सचिव अल्हाज फारूख अहमद देशमुख, संचालक शफीक अहमद देशमुख, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच निलंगा शहरातील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या सोहळ्यास महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष एम. ए. गफार, कार्याध्यक्ष युनूस अन्सारी, लातूर जिल्हा उर्दू शिक्षक संघटनेचे अध्यक्ष नुसरत काद्री, औसा येथील नगरपरिषदेचे प्रभारी नगराध्यक्ष प्रा. अफसर शेख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना प्रती टन ५०० रूपये अनुदान द्यावे : राजू शेट्टी
# ऊस उत्पादकांसाठी ७ प्रमुख मागण्या

तभा वृत्तसेवा

औसा दि. २४ सप्टेंबर : सध्या उसाची परिपक्वता कमी असल्याने यंदाचा ऊस गळीत हंगाम १५ ऑक्टोबरपासून सुरू केल्यास साखर उतारा घटून शेतर्कयांचे वजनात आणि कारखान्यांचे उर्तय़ांत अधिक नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे गळीत हंगाम उशिरा सुरू करावा.साखरेच्या किमान विक्री दरात आणि इथेनॉलच्या खरेदी दरात वाढ करावी.व शेतकऱ्यांना प्रती टन ५००रूपये अनुदान द्यावे .अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी केली आहे.

औसा येथे आमदार अभिमन्यू पवार यांचीअध्यक्ष राजू शेट्टी यांनी भेट घेतली.यावेळी सात प्रमुख मागण्यांचे निवेदन देत ते बोलत होते.गेल्यावर्षी पावसाचा अतिरेक झाल्याने उसाची लागवड उशिरा झाली.ऊसाच्या परिपक्वते पुर्वी १५ ऑक्टोबरपासून गाळप सुरू केल्यास वाढ पूर्ण होण्यापूर्वीच ऊस तोडणी करावी लागेल. यामुळे उसाच्या वजनात आणि रिकव्हरीत मोठी घट होऊ शकते, असे शेट्टी यांनी स्पष्ट केले.



**ऊस वाहतुकीचे दर निश्चित करावेत**

देशातील साखरेच्या साठ्यात गैरव्यवहार असल्याची शक्यता असून त्याची चौकशी करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने 'टास्क फोर्स' नेमावा. आयात होणाऱ्या इथेनॉलवर आयात शुल्क आकारावे. सध्या दोन कारखान्यांतील २५ किलोमीटर हवाई अंतराची अट असली तरी लांबून ऊस आणावा लागत असल्याने वाहतूकीच्या खर्चाचा भुर्दंड अप्रत्यक्षपणे शेतकऱ्यांवर पडतो आहे. त्यामुळे १ ते २५, २५ ते ५० आणि ५० ते १०० किमी अंतरानुसार ऊस तोडणी आणि वाहतुकीचे दर स्वतंत्रपणे निश्र्चित करावेत.अशी मागणी राजू शेट्टी यांनी केली.

साखर उद्योग, शेतकरी व कामगारांच्या प्रश्र्नांवर केंद्र व राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यावेत. या मागणीसाठी शेट्टी सध्या राज्यातील विविध कारखान्यांना भेटी देत आहेत. याअंतर्गत त्यांनी किल्लारी येथील निळकंठेश्र्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्यालाही भेट देऊन चर्चा केली.

साखरेचा किमान हमीभाव प्रतिकिलो ५० रुपये आणि सी-हेवी इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७० रुपये निश्र्चित करावा. १५ ऑक्टोबरपासून गाळप सुरू केल्यास रिकव्हरी घटणार असल्याने शेतकऱ्यांना प्रतिटन ५०० रुपये अनुदान द्यावे. इथेनॉलवरील निर्बंधामुळे कारखान्यांना बसणाऱ्या फटक्यामुळे कर्ज हप्त्यांना मुदतवाढ व वर्षभराची व्याजात सवलत द्यावी. कारखान्यांना नाबार्ड किंवा एनसीडीसीमार्फत ४ टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून द्यावे. अशी मागणी शेट्टी यांनी निवेदनाद्वारे केली आहे.याचबरोबर ऊस वाहतूक व तोडणी दर अंतरानुसार (स्लॅबनुसार) निश्र्चित करावेत.ऊस वाहतूक आणि साठ्याची चौकशी करावी.अशा या मागण्यांचे निवेदन आमदार अभिमन्यू पवार यांनी स्विकारले असून मुख्यमंत्री यांच्याकडे सकारात्मक दृष्टिकोनातून मांडणार असल्याचे आश्र्वासन त्यांनी यावेळी दिले.

## 'शेतकरी मेळावा अपडेट

### गणेशोत्सवानिमित्त मराठवाडा हायस्कूलमध्ये भव्य निबंध स्पर्धा; २५० विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**परभणी,/प्रतिनिधी :** शिवाजीनगर येथील एन. व्ही. एस. मराठवाडा हायस्कूलमध्ये गणेशोत्सव २०२६चे औचित्य साधून भव्य निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, लेखन कौशल्याचा विकास व्हावा तसेच गणेशोत्सवाचे सामाजिक व ऐतिहासिक महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फ ूर्त प्रतिसाद मिळाला असून प्रशालेतील तब्बल २५० विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार निबंधासाठी विविध विषय देण्यात आले होते. 'माझा लाडका बाप्पा आणि पर्यावरण', 'गणेशोत्सवाचे बदलणारे स्वरूप : काल आणि आज' तसेच 'लोकमान्य टिळकांचे सार्वजनिक गणेशोत्सव आणि सामाजिक ऐक्य' या विषयांवर विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. पर्यावरणपूरक गणेशोत्सव, ध्वनी प्रदूषणमुक्त उत्सव, शाडूच्या मूर्तींचे महत्त्व आणि सामाजिक सलोखा यांसारख्या विषयांवर विद्यार्थ्यांनी मार्मिक लेखन केले. स्पर्धेदरम्यान प्रशालेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्याने संपूर्ण परिसर वैचारिक ऊर्जेने भारावून गेला होता. स्पर्धेचे नियोजन सुरळीतपणे पार पाडण्यासाठी निबंध विभागातील प्रदीप मुळे, मीरा चात्रे आदी शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या शिस्तबद्ध नियोजनामुळे निबंध स्पर्धा शांततेत आणि यशस्वीरीत्या पार पडली.

### वाघी बोबडे येथे आयुर्वेद दिनानिमित्त आयोजित शिबीरात ७८ ज्येष्ठ नागरिकांची तपासणी

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील वाघी बोबडे येथील आयुष्मान आरोग्य मंदिर (आयुष) येथे बुधवारी (दि. २३) आयुर्वेद दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी वैद्यकीय अधिकारी डॉ. अनंत दहिवाल यांच्या हस्ते धन्वंतरी व ओमकार प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर आयुर्वेद दिनाची प्रार्थना घेण्यात आली. प्रतिमा पूजन व प्रार्थनेनंतर योग प्रशिक्षक गजानन चौधरी यांनी उपस्थितांना योगासंबंधी मार्गदर्शन केले. त्यानंतर डॉ. अनंत दहिवाल व प्रा. संतोष साखरे यांनी ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना ङ्गआयुर्वेद दिनाचे महत्त्व व सध्याची जीवनशैलीफ या विषयावर मार्गदर्शन केले. बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्यावर होणारे परिणाम आणि आयुर्वेदाचे महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली. कार्यक्रमानंतर ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यामध्ये ३२ महिला आणि ४६ पुरुष अशा एकूण ७८ नागरिकांची आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक औषधोपचार करण्यात आले. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वैद्यकीय अधिकारी डॉ. अनंत दहिवाल यांच्या मार्गदर्शनाखाली योग प्रशिक्षक गजानन चौधरी, औषधनिर्माता विजयकुमार पोपळाईत, आरोग्य सेविका स्वाती पोहकर, आशा कार्यकर्त्या मीना कंठाळे तसेच इतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पुढाकार घेतला.

### जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्रिन्स इंग्लिश स्कूल, सेलूची दैदिप्यमान कामगिरी!

**परभणी,/प्रतिनिधी-** जिल्हास्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा २०२६ जिल्हास्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा २०२६ मध्ये प्रिन्स इंग्लिश स्कूल, सेलू ने प्रथम क्रमांक पटकावत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

याचबरोबर शाळेची विद्यार्थिनी कु. तेजश्री महेशकुमार चौधरी (इयत्ता ९ वी) हिने तालुकास्तरीय विज्ञान मेळाव्यात प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्तरासाठी निवड निश्चित केली आहे. तिच्यासोबत तत्त्वमशी शिंदे हिनेही उत्कृष्ट कामगिरी केली.या यशामागे मार्गदर्शक शिक्षक श्री. रविशंकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या अभूतपूर्व यशानिमित्त श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे, सचिव डॉ. सविता रोडगे, सदस्य डॉ. आदित्य रोडगे, प्रशासकीय अधिकारी प्रा. महादेव साबळे, मुख्याध्यापक सुबोध हिवराळे, अनिल कुमार, अब्दुल बाशा आणि मीरा मिरांडा यांनी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले, अभिनंदन केले व पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

### सेलू-पाथरी रोडवरील रेल्वे ओव्हरब्रिजवरून पाथरी व रवळगाव कडे वळण रस्ता द्या; बाजार समितीचे सभापती डॉ. रोडगे



**सेलू,/प्रतिनिधी:** सेलू-आष्टी रस्ता रुंदीकरण व सिमेंट काँक्रिटीकरण कामाच्या पार्श्वभूमीवर, सेलू-पाथरी रोडवरील रेल्वे गेटवर प्रस्तावित ओव्हरब्रिजवरून पाथरी व रवळगावच्या दिशेने वळण रस्ता (सर्व्हिस रोड/टर) उपलब्ध करून देण्यात यावा, अशी आक्रमक मागणी जोर धरत आहे. या अत्यंत महत्त्वाच्या व लोकहिताच्या मागणीसाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती डॉ. संजय रोडगे यांच्या नेतृत्वाखाली परिसरातील शेकडो नागरिकांनी राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री ॐमा. ना. मेघनादीदी साकोरे-बोर्डीकर यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे. प्रमुख मुद्दे व मागण्या: ग्रामपंचायतींचे ठराव सादर या भागातील संबंधित सर्व ग्रामपंचायतींचे ठराव यापूर्वीच प्रशासनाला व कार्यालयाला सादर करण्यात आले आहेत. वाहतूक समस्या व सुरक्षितता या मार्गावर मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक संस्था, खाजगी उद्योग, कारखाने आणि कॉटन जिनिंग आहेत. तसेच मालवाहू कंटेनर व अवजड वाहनांची सतत वर्दळ असते. वळण रस्ता न मिळाल्यास भविष्यात वाहतुकीची मोठी कोंडी व दुर्घटना होण्याची भीती नागरिकांमधून व्यक्त होत आहे. प्रशासकीय बैठकीची मागणी संबंधित राष्ट्रीय महामार्ग विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि रेल्वे प्रशासनाची संयुक्त बैठक घेऊन प्रत्यक्ष पाहणी करावी व तातडीने वळण रस्ता मंजुरीचे निर्देश द्यावेत, अशी विनंती निवेदनात करण्यात आली आहे. आंदोलनाचा इशारा नागरिकांच्या या रास्त व अत्यंत महत्त्वाच्या मागणीबाबत लवकरात लवकर सकारात्मक व ठोस निर्णय न घेतल्यास, भविष्यात या भागातील ग्रामस्थ व नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन किंवा उपोषणाचा मार्ग स्वीकारला जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. निवेदनावर डॉ. संजय रोडगे (सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, सेलू) यांच्यासह माऊली ताठे, श्री रामेश्वर रोडगे, रामेश्वर राठी, निर्मलाताई लिपणे, अश्विनी पवार, प्रभाकर गजमल, रामेश्वर गटकळ, दीपक रोडगे, विलास रोडगे, संतोष रोडगे, प्रकाश गजमल, राजेभाऊ गाडेकर, मोतीराम गायकवाड, मंगेश पवार, भाऊराव लहाने, संजय गटकळ, महादेव नजान, विठ्ठलराव ताठे, गजानन ताठे, विकास ताठे, कैलास ताठे, रोहिदास भदरगे, गोविंद भदर्गे, भागवत लिखने, कैलास पवार, सूर्यभान भोसले, अशोक लिपणे, दीपक गटकळ, आसाराम रोडगे, कैलास मोगरे, संतोष सरोदे, श्रीराम पितळे, कल्याण मोगरे, दत्ता पवार, योगेश खरवडे

# दुष्काळी मदतीसाठी जाधव आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांची भेट

## परभणी जिल्ह्यात पावसाचा मोठा खंड, सोयाबीन, तुर,मूग,कापूस नगदी पिकांनी टाकल्या माना



**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी:-** परभणी लोकसभा मतदारसंघातील विविध विकासकामे, प्रलंबित प्रश्न तसेच नागरिकांच्या मागण्यांसंदर्भात खासदार संजय जाधव यांनी बुधवार २३ सप्टेंबर रोजी मंत्रालयात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच मंत्री मकरंद पाटील, भारत गोगावले आणि संजय राठोड यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी विविध प्रश्नांबाबत मंत्र्यांना निवेदन देत शासनस्तरावर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.

उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यासोबत झालेल्या चर्चेदरम्यान परभणीसह मराठवाड्यातील दुष्काळसदृश परिस्थितीकडे पुन्हा लक्ष वेधत शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी जाधव यांनी केली. पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे सांगत परिस्थिती गंभीर असल्याचे त्यांनी नमूद केले. शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत, कर्जमाफी, पीक विम्याचा लाभ, रोजगार हमीची कामे सुरू करणे, मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे हाती घेणे, जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करणे तसेच गावागावांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.

यासोबतच परभणी लोकसभा मतदारसंघातील विविध विकासकामांना गती देणे, प्रलंबित कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणे आणि नागरिकांच्या प्रश्नांकडे शासनस्तरावर तातडीने लक्ष देण्याबाबतही संबंधित मंत्र्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन मंत्र्यांकडे सादर करण्यात आले.यावेळी एकनाथ शिंदे यांनी परभणीकरांसाठी आपण सर्वाथाने मदत करेल असेही आश्वासन दिले.

## दीपस्तंभ प्रतिष्ठानकडून २५ वृद्धांना मिळणार नवदृष्टी

**परभणी,/प्रतिनिधी-** ग्रामीण भागातील गरजू वृद्धांच्या डोळ्यांतील अंधार दूर करून त्यांना पुन्हा नव्याने जग पाहता यावे, या उद्देशाने दीपस्तंभ प्रतिष्ठानच्या वतीने मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया उपक्रम राबविण्यात येत आहे. पाथरी तालुक्यातील वडी व कासापुरी येथे १६ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या मोफत तपासणी शिबिरातून निवड झालेल्या २५ रुग्णांना पुढील मोफत शस्त्रक्रियेसाठी बुधवार २३ सप्टेंबर रोजी मुंबईकडे रवाना करण्यात आले.

राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या सहकार्याने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. हादगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. क्षीरसागर, मस्के तसेच गावातील आशा स्वयंसेविकांचे सहकार्य लाभले. रंगनाथ सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात तपासणी केल्यानंतर मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड झालेल्या २५ रुग्णांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च दीपस्तंभ प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येणार आहे.

## पोखर्णीत १३२ केव्ही उपकेंद्र उभारा; वीज समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करा : सभापती ऐश्वर्या चव्हाण यांची पालकमंत्र्यांकडे मागणी

**परभणी,/प्रतिनिधी-** परभणी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वीज समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी पोखर्णी नृसिंह (शिवारा) येथे नवीन १३२ केव्ही ईएचव्ही विद्युत उपकेंद्र मंजूर करून उभारण्यात यावे, अशी मागणी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समिती सभापती ऐश्वर्या अजय चव्हाण यांनी पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सध्या मराठवाड्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, परभणी तालुक्यातील शेतकऱ्यांना पाणीटंचाईसोबतच वीज समस्येलाही सामोरे जावे लागत आहे. पोखर्णी येथील ३३ केव्ही वाहिनीवर अनेक उपकेंद्रे जोडलेली असल्याने या वाहिनीवर मोठ्या प्रमाणात विद्युत भार येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना अपेक्षित वीजदाब मिळत नसल्याने कृषी पंप सुरळीतपणे चालत नाहीत. परिणामी पिकांना आवश्यक पाणी देताना शेतकऱ्यांच्या अडचणी वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर पोखर्णी नृसिंह (शिवारा) येथे १३२ केव्ही ईएचव्ही विद्युत उपकेंद्र तातडीने मंजूर करून उभारण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या उपकेंद्रामुळे परिसरातील शेतकऱ्यांना स्थिर वीजदाब मिळण्यास तसेच कृषी पंपांचा वीजपुरवठा अधिक सुरळीत होण्यास मदत होईल, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

यापूर्वी पोखर्णी परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याची मागणीही करण्यात आली होती. त्या मागणीचा सकारात्मक विचार करून प्राथमिक आरोग्य केंद्राला लवकरात लवकर मान्यता देण्याची विनंतीही यावेळी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या वीज समस्येची दखल घेऊन १३२ केव्ही उपकेंद्राच्या मागणीवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा निवेदनाद्वारे व्यक्त करण्यात आली.

## श्रीराम प्रतिष्ठानच्या संकल्पनेतून प्रिन्स इंग्लिश स्कूलमध्ये 'नो बॅग स्कूल' उपक्रम उत्साहात

### पियुष बिनायके यांचे व्यवसाय विषयक मार्गदर्शन, सुतारकाम व शिवणकामाची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांसाठी आकर्षण

**सेलू,/प्रतिनिधी-** श्रीराम प्रतिष्ठान, सेलूचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे यांच्या संकल्पनेतून एल.के.आर. रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूल, सेलू येथे शनिवारी (दि. १२ सप्टेंबर २०२६) करिअर स्किल डिस्कव्हरी कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. ' ' या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या पलीकडील प्रत्यक्ष जीवनातील कौशल्यांचा अनुभव देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संजय रोडगे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना करिअर नियोजन, जीवनकौशल्ये, आर्थिक साक्षरता आणि आत्मविश्वासाचे महत्त्व पटवून देत भविष्याभिमुख शिक्षणाचा संदेश दिला. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणून प्रतिष्ठित उद्योजक श्री. पियुष बिनायके यांनी विद्यार्थ्यांना व्यवसाय, द्योजकता, नेतृत्वगुण आणि आर्थिक नियोजन याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. यशस्वी उद्योजक होण्यासाठी आवश्यक




असलेली शिस्त, मेहनत आणि दूरदृष्टी यावर त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी विद्यार्थ्यांसाठी सुतारकाम ( ) आणि शिवणकाम ( ) यांची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली. सुतारकाम व शिवणकाम कसे केले जाते, त्यासाठी कोणती साधने वापरली जातात आणि या व्यवसायांमध्ये करिअरच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत, याची माहिती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून देण्यात आली. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच इयत्ता ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी स्किल डेव्हलपमेंट प्रोग्राम आणि आर्थिक साक्षरता ( ) सत्र आयोजित करण्यात आले. इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांनी पोलीस स्टेशन, रेल्वे स्टेशन, बसस्थानक आणि वॉटर फिल्टर प्रकल्पाला शैक्षणिक भेट देत जीवनाशी निगडित विविध सेवांची माहिती घेतली. यावेळी मंचावर संस्थेचे सदस्य डॉ आदित्य रोडगे, प्रशासकीय अधिकारी प्रा महादेव साबळे,प्राचार्य सुबोध हिवराळे, अनिल कुमार आणि मीरा मिरांडा यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी या संकल्पनेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. करिअरविषयक जागरूकता, जीवनकौशल्ये आणि अनुभवाधारित शिक्षणाचा संगम घडवून आणणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी ठरला.

## क्रीडा स्पर्धेत एकलव्य बाल विद्या मंदिरचे घवघवीत यश

**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये एकलव्य बाल विद्या मंदिर माध्यमिक विद्यालय, जिंतूरच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. कुस्ती आणि बॅडमिंटन या दोन्ही क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत १७ वर्षे वयोगटात नागेश सखाराम पवार याने प्रथम क्रमांक, तर विक्रम नारायण रोकडे याने द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच १४ वर्षे वयोगटात आर्यन जगदीश पाईकराव याने द्वितीय क्रमांक पटकावला.




त्याचप्रमाणे तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत एकलव्य बाल विद्या मंदिरच्या मुलींच्या संघाने तसेच मुलांच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळवला. मुलींच्या संघात राशी राजकुमार लहाने, श्राव्या सुरेश कापुरे, दुर्वा सुधीर पोफळे, तनुश्री राजेश्वर स्वामी आणि दिपाली सुनील राठोड यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. मुलांच्या संघात द्रोण सुरेंद्र सिडाम, कृष्णा किरण चव्हाण, आर्यन अमोल आडे आणि स्वराज माधव पिसाळ यांनी उत्तम कामगिरी करत शाळेचे नाव उज्ज्वल केले. या यशामागे शाळेचे क्रीडा शिक्षक श्री. राजकुमार लहाने यांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांचा नियमित सराव आणि अथक मेहनत महत्त्वपूर्ण ठरली. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री. एस. पी. गीते सर आणि पर्यवेक्षक श्री. एस. बी. दराडे सर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल क्रीडा भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षणाबरोबरच खेळालाही महत्त्व असून, खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, आत्मविश्वास, संघभावना आणि खिलाडूवृत्ती विकसित होते.

# काळा घोडा येथे क्रिएटिव्ह व्हिजन समूह प्रदर्शनाचा भव्य शुभारंभ; परभणीच्या काका सुशीलकुमार यांच्यासह २० कलाकारांच्या कलाकृतींचा संगम

**पाथरी,/प्रतिनिधी-** रेनबो आर्ट ग्रुप आयोजित बहुचर्चित क्रिएटिव्ह व्हिजन समूह चित्र प्रदर्शन मंगळवार दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ ते ७ वाजता मुंबईच्या कला-संस्कृतीचे माहेरघर असलेल्या आर्टिस्ट सेंटर, आर्मी अँड नेव्ही बिल्डिंग, काळा घोडा, फोर्ट येथे दिमाखात उद्घाटन सोहळा पार पडला.

चित्रकला, रेखाचित्र, ग्राफिक्स, छायाचित्रण आणि संगणकीय कला अशा पाचही कलाप्रकारांचा अद्भुत संगम या एकाच छताखाली अनुभवायला मिळणार आहे.

या प्रदर्शनाचे उद्घाटन कला व सामाजिक क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. प्रमुख अतिथी म्हणून चेंबर ऑफ कॉमर्स), प्रा. अनिल नाईक (माजी विभाग प्रमुख, सर जे. जे. कला महाविद्यालय), श्री. प्रकाश बाळ जोशी (ज्येष्ठ चित्रकार व पत्रकार),श्री. राजेंद्र पाटील (संचालक, इंडिया आर्ट फ ेस्टिव्हल), पद्मश्री सुधराक ओलवे (प्रसिद्ध छायाचित्र पत्रकार), प्रा. पठारे ज्योत्स्ना विनोद (माजी प्राचार्य, राहेजा कला महाविद्यालय) आणि डॉ. दीपक खांडेकर (अभिनेते, लेखक) उपस्थित होते. देशभरातील २० नामवंत कलाकारांचा सहभाग - मराठवाड्याचा अभिमान या राष्ट्रीय स्तरावरील प्रदर्शनात देशभरातून निवडक २० कलाकारांच्या कलाकृती मांडण्यात आल्या आहेत. यामध्ये परभणीचे जी.(सुशील एन. घुंबरे) यांचाही समावेश असून त्यांनी मराठवाड्याच्या शेतमातीचा ठसा पुन्हा एकदा मुंबईच्या ताजनगरीत उमटवला आहे. या प्रदर्शनाक सहभागी कलाकार पुढीलप्रमाणे बिस्वज्योती पाठक, चंद्रशेखर भट, दिनेश कुमार, दिव्या खानेजा, डॉ. तपस कुमार जाना, काका सुशीलकुमार जी., लता साहू, महेंद्र एस. शेंद्रे, नीलू पटेल, नितीन कुलकर्णी, राजेंद्र दिंडोरकर, रीना जैन, रेखा कुमारी, सपना केदिया, शिल्पा, शिरीष जोगलेकर, सोना कपूर हैदर, टेल्स्लीन ऑगस्टीन, विरेंद्र कुमार आणि यशिका धाबरे. हे प्रदर्शन दि. २२ ते २८ सप्टेंबर २०२६ पर्यंत दररोज सकाळी ११ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सर्व कला रसिकांसाठी खुले



# एसआयआर मधील ३५ हजार मतदारांच्या सुनावणीसाठी अधिकारी नियुक्त

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांची पत्रकार परिषदेत माहीती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ सप्टेंबर**
जिल्ह्यात मतदार यादी सखोल विशेष पुनरिक्षण कार्यक्रमात मतदार यादीतील नावात जुळवणी व इतर कारणांवरून ३५ हजार मतदारांना नोटीस पाठविण्यात आल्या असून त्यांच्या सुनावणीसाठी ५० अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहीती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी गुरूवारी पत्रकार परिषदेत दिली.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवाड, उपविभागीय अधिकारी चोंडेकर यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना जिल्हाधिकारी गुप्ता म्हणाले की, हिंगोली जिल्ह्यात मतदार यादी सखोल विशेष पुनरिक्षण कार्यक्रमात बीएलओमार्फत प्रत्येक मतदारांशी संपर्क करण्यात आला आहे. यामध्ये स्थलांतर, मृत झालेल्या मतदारांचे मॅपींग झाले नाही. याशिवय सुमारे ३५ हजार मतदारांची नावे सन २००२ च्या मतदार यादीतील त्यांच्या नातेवाईकांच्या नावासोबत जुळली नाही. त्यामुळे या ३५ हजार मतदारांना नोटीस पाठविण्यात आली आहे. यामध्ये हिंगोली विधानसभा संघातील सुमारे ८ हजार ९००, वसमत विधानसभा संघातील १४ हजार ५६५, कळमनुरी विधानसभा संघातील ११ हजार ५३२ मतदारांचा समावेश आहे. या मतदारांना नोटीस पाठवून त्यांना दिलेल्या तारखेला आवश्यक पुरावे घेवून सुनावणीसाठी हजर राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. यामध्ये संबंधित मतदारांनी कोठे हजर रहावे त्यांची सुनावणी कोण घेणार आहे, याची सविस्तर माहीती देखील नोटीसमध्ये नमुद करण्यात आली आहे.

या मतदारांच्या सुनावणीसाठी जिल्ह्यात ५० अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या असून यामध्ये तहसीलदार, गटविकास अधिकारी, पालिकेचे मुख्याधिकारी यांच्यासह इतर अधिकाऱ्यांचा समावेश आहे. संबंधित मतदारांनी नोटीस मिळाल्यानंतर त्यांना दिलेल्या तारीख व वेळेत सुनावणीसाठी हजर राहण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी चोंडेकर यांनी केले आहे.

# आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्याकडून मुख्यमंत्री सहायता निधीला एक महिन्याचे मानधन

## जिल्हाधिकाऱ्यांकडे केला धनादेश केला सुपूर्द



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ सप्टेंबर**
सध्या राज्यात पावसाच्या अभावामुळे गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, आपला अन्नदाता शेतकरी बांधव मोठ्या संकटाचा सामना करत आहे. या कठीण काळात बळीराजाला सावरण्यासाठी प्रशासकीय व वैयक्तिक अशा दोन्ही स्तरांवरून मदत करणे अत्यंत गरजेचे आहे, हीच सामाजिक बांधिलकी जपत हिंगोली विधानसभा मतदारसंघाचे आमदार तान्हाजी मुटकुळे यांनी आपल्या एक महिन्याचे मानधन मुख्यमंत्री सहायता निधीसाठी सुपूर्द केले आहे.

आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांचा एक महिन्याच्या मानधनाचा दोन लाख अकरा हजार रुपये रकमेचा धनादेश हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्याकडे भाजयुमो जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे यांनी सुपूर्द केला.

याप्रसंगी प्रसारमाध्यमांशी बोलताना शिवाजीराव मुटकुळे म्हणाले की, शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा आणि समाजाचा मुख्य कणा आहे. निसर्गाच्या अवकृपेमुळे आज तो संकटात सापडला आहे. अशा वेळी केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष कृतीतून मदत करणे आमचे कर्तव्य आहे. आम्ही सदैव आमच्या शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत आणि यापुढेही त्यांच्या हक्कासाठी व मदतीसाठी कटिबद्ध राहू. धनादेश सुपूर्द करताना जिल्हाधिकारी कार्यालयात माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, के. के. शिंदे, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, प्रशांत सोनी, संतोषराव टेकाळे, माणिकराव लोडे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहित, मोतीराम इंगोले, श्रीरंग राठोड, पद्माकर नायक, हनुमान कराळे, वैजनाथ शिंदे, राहुल शिंदे यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहरात गणेशमूर्ती विसर्जनासाठी आठ ठिकाणी अमृत कलश कुंड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ सप्टेंबर**
शहरात गणेशमूर्ती विसर्जनासाठी नगर पालिका प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली असून गणेश मंडळांच्या सोयीसाठी आठ ठिकाणी अमृत कलश कुंडव निर्माल्य संकलन कुंडाची उभारणी करण्यात आली आहे. गणेश मंडळांनी तसेच घरगुती गणेशमूर्तींचे या ठिकाणी विसर्जन करण्याचे आवाहन मुख्याधिकारी प्रांजली मुंडे यांनी केले आहे.

शहरात सुमारे २०० पेक्षा जास्त ठिकाणी गणेश मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे. याशिवाय घरोघरी गणेशमूर्ती स्थापन करण्यात आले आहेत. शुक्रवारी अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात येणार आहे. यासाठी पोलिस प्रशासन, नगर पालिका प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे.

शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांनी स्थापन केलेल्या गणेशमूर्ती इंदिरा कारखाना कार्यालयाच्या परिसरातील विहीर, तिरूमला लॉन्स जवळील विहीर तसेच कयाधू नदीच्या पात्रात विसर्जन केले जाणार आहे. याठिकाणी गणेशभक्तांची गर्दी होऊन अनुचीत प्रकार घडू नये यासाठी विहीरीच्या परिसरात बॅरिकेटींग करण्यात आले असून ठिकठिकाणी जाळ्या बसविण्यात आल्या आहेत. याशिवाय परिसरात विद्युतीकरण करण्यात आले आहे. महादेववाडी परिसरात कयाधू नदीमध्ये गणेशमूर्ती विसर्जन करतांना दुर्दैवी प्रकार घडू नये यासाठी जीव रक्षकांचेदोन पथक तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय लहान गणेश मंडळांच्या गणेशमूर्ती तसेच घरगुती गणेश मूर्ती विसर्जनासाठी सहा ठिकाणी अमृत कलश कुंड बसविण्यात आले आहेत. यामध्ये आदर्श महाविद्यालय, एनटीसी भागातील महेश उद्यान, नवीन नगर पालिका मुख्य प्रवेश द्वार, छत्रपती शिवाजी नगर येथील दत्त मंदिर तसेच अग्नीशमन दल कार्यालयाजवळ, रिसाला बाजार, बेलवाडी बंधारा हे कुंड आहेत. या कुंडाच्या बाजूलाच निर्माल्य संकलन कुंड बसविण्यात आले आहेत. विसर्जनापूर्वी निर्माल्य संकलन करून त्यानंतर अमृत कलशात गणेश मूर्ती विसर्जित करता येणार आहे. या सहा ठिकाणाची मुख्याधिकारी प्रांजली मुंडे, उपमुख्याधिकारी प्रकाश साबळे, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, आकाश देशमुख, साहेब भुरके, कार्यालयीन अधीक्षक सचिन पवार यांनी पाहणी केली आहे.



**हिंगोली– येथील जिल्हा परिषद सभागृहात गुरूवारी माझं गाव आरोग्य संपन्न गाव या मोहीमेचा जिल्हास्तरीय आढावा मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी घेतला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, प्रकल्प संचालक केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गड्डापोड यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख यांची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### लोकसंवादमध्ये पुरवठा विभागाकडून माहीती



हिंगोली– माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या लोकसंवाद २०२६ उपक्रमांतर्गत जिल्हा माहिती कार्यालय, हिंगोलीच्या वतीने श्री गजराज बाल गणेश मंडळ, पोस्ट ऑफिससमोर, हिंगोली येथे नागरिकांसाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी पुरवठा विभागाकडून देण्यात येणाऱ्या सुविधाबाबत नागरिकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात पुरवठा निरीक्षक जान्हवी पानसे यांनी मार्गदर्शन केले. लोकसंवाद २०२६ उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. यावेळी गणराज बाल गणेश मंडळाचे अध्यक्ष विशाल बडजाते, अनुप झंवर यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

### नवसाच्या मोदकाची जय्यत तयारी



हिंगोली– हगोली येथील मोदकाचा गणपती म्हणून प्रसिध्द असलेल्या विघ्नहर्ता श्री चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी तसेच नवसाचा मोदक घेण्यासाठी शुक्रवारी लाखो भाविक हिंगोली शहरात दाखल होणार आहेत. संस्थानच्यावतीने नवसाचे मोदक तयार करण्याचे काम युध्दपातळीवर सुरू असून यासाठी मंदिर संस्थानसह महिला परिश्रम घेत आहेत.

### कयाधू नदीचे पात्र कोरडेठाक



हिंगोली– यावर्षी समाधानकारक पाऊस न पडल्यामुळे शहरातून वाहणाऱ्या कयाधू नदीचे पात्र कोरडेठाक असून गणेश विसर्जनासाठीही नदी पात्रात पाणी दिसत नाही.

# विघ्नहर्ता श्री चिंतामणीच्या दर्शनासाठी ४ लाख भाविक दर्शनासाठी येण्याचा अंदाज



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ सप्टेंबर**
हिंगोली येथील मोदकाचा गणपती म्हणून प्रसिध्द असलेल्या विघ्नहर्ता श्री चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी तसेच नवसाचा मोदक घेण्यासाठी यावर्षी सुमारे ४ लाखांपेक्षा जास्त भाविक येण्याचा अंदाज वर्तवला जात असून भाविकांच्या सोयीसाठी शहरातील वाहतुक मार्गात बदल करण्यात आला आहे. तसेच आरोग्य पथके, पोलिस बंदोबस्त, स्वयंसेवक यांची तैनाती करण्यात आली आहे.

विघ्नहर्ता श्री चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी राज्यासह परराज्यातून मोठ्या संख्येने भाविक दि २५ सप्टेंबर रोजी हिगोलीत दाखल होणार आहेत. मोदकाचा नवस फेडण्यासाठी तसेच नवसाचा मोदक घेण्यासाठी भाविक येत असतात. यावर्षी ४ लाखांहून अधिक भाविक येण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून भाविकांच्या सोयीसाठी ५० हजार क्षमतेचा वॉटरप्रुफ मंडप उभारण्यात आला आहे. शहरातील रस्त्याच्या मार्गात बदल करण्यात आला आहे. ठिकठिकाणी स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली असून चप्पल स्टँड पासून ते भाविकांच्या फराळाची, चहापाणाची तसेच रात्री जेवणाची व्यवस्था दानशूर व्यक्तीकडून करण्यात आली आहे. लवकर दर्शन व्हावे यासाठी परराज्यातून भाविक मुक्कामी येत असतात. भाविकांच्या वाहनांची पार्कींगसाठी व्यवस्था करण्यात आली आहे.

आरोग्य विभागाच्यावतीने गांधी चौक, महेश चौक याठिकाणी आरोग्य पथके तैनात करण्यात आली आहेत. तसेच दोन रूग्णवाहीका देखील तैनात करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, पोलिस अधीक्षक डॉ श्रेणीक लोढा, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्यासह अधिकाऱ्यांनी दर्शन रांग व मंदिर परिसराची पाहणी केली असून ठिकठिकाणी चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे.

# जात पडताळणीसाठी १७ ऑक्टोबरपर्यंत विशेष शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ सप्टेंबर**
सेवा संकल्प अभियानांतर्गत इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेले विद्यार्थी तसेच सन २०२६-२७ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रलंबित प्रकरणातील त्रुटींची पूर्तता करण्यासाठी १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विशेष अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग या आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी २८,२९ व ३० सप्टेंबर २०२६ रोजी कार्यालयीन वेळेत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, हिंगोली येथे उपस्थित राहावे.

आरक्षित प्रवर्गातून व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. विशेष बाब म्हणून अशा विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी प्रवेश घेतल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. या कालावधीत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रकरणे सादर केलेली आहेत; मात्र प्रकरणातील त्रुटींमुळे अद्याप जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी हे विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

संबंधित विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांना प्रकरणातील त्रुटींची पूर्तता करण्यासाठी समितीसमोर उपस्थित राहता येणार आहे. नियमानुसार त्रुटींची पूर्तता झालेल्या प्रकरणांमध्ये पात्र विद्यार्थ्यांना तत्काळ जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येत आहे.

अद्याप जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त न झालेल्या विद्यार्थ्यांनी या विशेष शिबिराचा लाभ घेऊन आपल्या प्रकरणातील त्रुटींची पूर्तता करावी, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त तथा सदस्य अमोल यावलीकर यांनी केले आहे.

# लोकसंवाद कार्यक्रमात शेतकऱ्यांना एआय महाविस्तार ॲपच्या वापराबाबत मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २४ सप्टेंबर**
महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या लोकसंवाद २०२६ उपक्रमांतर्गत जिल्हा माहिती कार्यालय, हिंगोलीच्यावतीने श्री रुद्राक्ष गणेश मंडळ, शिवनेरी चौक, अकोला बायपास, हिंगोली येथे आयोजित कार्यक्रमात शेतकऱ्यांना एआय विस्तार ॲपच्या वापराबाबत कृषी विभागाच्या वतीने सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

सहाय्यक कृषी अधिकारी अनंत मस्के यांनी एआय विस्तार ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उपलब्ध होणाऱ्या विविध सुविधांची माहिती दिली. या ॲपवर कीड व रोग नियंत्रण, रिअल-टाइम हवामान अंदाज, बाजारभाव, शासकीय योजनांची माहिती तसेच कृषी विभागाच्या विविध योजना, अनुदान व त्यासाठीची पात्रता याबाबत माहिती उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच मृदा आरोग्य व खत व्यवस्थापनाबाबतही या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून मार्गदर्शन मिळते. माती परीक्षणाच्या आधारे पिकांसाठी आवश्यक खतांची योग्य मात्रा कशी वापरावी, याबाबत माहिती मिळत असल्याने अनावश्यक व चुकीच्या खतांचा वापर टाळून उत्पादन खर्चात बचत करण्यास शेतकऱ्यांना मदत होऊ शकते, असे यावेळी सांगण्यात आले. एआय विस्तार ॲप डाउनलोड करण्याची प्रक्रिया व त्याचा वापर याबाबतही सहाय्यक कृषी अधिकारी अनंत मस्के यांनी प्रात्यक्षिकासह माहिती दिली.

यावेळी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे सहाय्यक कृषी अधिकारी विजय पवार, जिल्हा माहिती कार्यालयाच्या उपसंपादक अलका पाटील, मानसी राऊत, श्री रुद्राक्ष गणेश मंडळाचे आयोजक दिलीप माने, अध्यक्ष सतीश घोरपडे, सदस्य सुमित घिके, गोविंद सारस्वत, शिवाजी गायकवाड, सतीश लोणकर, सुनील काळे, संतोष चंद्रवंशी, रवींद्र जाधव, विनायक मधीलवार, आनंद नागरे, दयानंद मुधोळ, आकाश काळे, आशुतोष वेरूळकर आदी उपस्थित होते.

# शिवकालीन युध्दकला व मर्दानी खेळांचे चित्त थरारक सादरीकरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ सप्टेंबर**
श्री सिद्धिविनायक सार्वजनिक बालगणेश मंडळ, एनटीसी, हिंगोली यांच्या वतीने आयोजित गणेशोत्सवाच्या निमित्ताने शिवकालीन युद्धकला व मर्दानी खेळाचे भव्य आणि चित्तथरारक सादरीकरण करण्यात आले. शंभूराजे मर्दानी आखाडा, हिंगोली यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

बुधवार दि.२३ सप्टेंबर रोजी श्री सिद्धिविनायक सार्वजनिक बाल गणेश मंडळ, एनटीसी हिंगोली येथे शिवकालीन युध्दकला व खेळाचे प्रत्यक्ष सादरीकरण आयोजित करण्यात आले होते. यावेळी पत्रकार संदीप नागरे, समाधान कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.शिवकालीन परंपरेतील शौर्य, धाडस आणि युद्धकौशल्याची प्रचिती देणाऱ्या या सादरीकरणात दानपट्टा, तलवारबाजी, लाठी-काठी, आगीचे मडके फोडणे यांसह विविध मर्दानी खेळांचे थरारक प्रदर्शन करण्यात आले. काही साहसी आणि जोखमीच्या प्रयोगांनी उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः रोमांच उभे केले. शंभूराजे मर्दानी आखाड्याचे आखाडा प्रमुख बजरंग कदम तसेच महिला प्रशिक्षिका समृद्धी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली आखाड्याच्या खेळाडूंनी विविध युद्धकला व मर्दानी खेळांचे सादरीकरण केले.

# दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा, तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या रजेला निर्बंध

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ सप्टेंबर -**

नांदेड जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची यंत्रणा अधिक गतिमान व सतर्क ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील क्षेत्रीय प्रमुख विभागांच्या जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या रजा मंजुरीबाबत कठोर निर्देश जारी केले आहेत.

जिल्ह्यात पाणीसाठा, चाराटंचाई तसेच पिकांचे नुकसान यामुळे शेतकरी बांधवांसमोर आर्थिक व मानसिक संकट निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांना गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शासनाच्या विविध आर्थिक सवलतींची प्रभावी अंमलबजावणी, कर्जमाफी, बियाणे व खते वाटप, पीक कर्ज पुनर्गठन तसेच शेतकरी सहाय्याच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे, असे निर्देश परिपत्रकाद्वारे देण्यात आले आहेत.

**मुख्यालय सोडण्यास सक्त मनाई**

महसूल, कृषी, ग्रामविकास, नगरविकास, महावितरण, पशुसंवर्धन, जलसंपदा, जलसंधारण, सहकार आणि भूमी अभिलेख (मोजणी) या विभागांतील सर्व जिल्हास्तरीय तसेच तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी दुष्काळ निवारण, पीक पाहणी, कर्ज पुनर्गठन आणि शेतकरी सहाय्याच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे. कोणत्याही अधिकाऱ्यास पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

**रजा मंजुरीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे**

दुष्काळी परिस्थिती संपेपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारची रजा, अतितातडीची स्वेच्छिक रजा वगळता, संबंधित जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या पूर्वपरवानगीनेच मंजूर करता येईल. क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या रजा मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी कोणतेही असले, तरी सद्यस्थितीत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय रजा मंजूर करता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

रजेचा अर्ज संबंधित विभागप्रमुखांच्या अभिप्रायासह थेट जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक असून, जिल्हाधिकारी कार्यालयाची लेखी पूर्वपरवानगी मिळाल्याशिवाय कोणत्याही अधिकाऱ्यास रजेवर जाता येणार नाही.

**विनापरवानगी गैरहजेरीवर कठोर कारवाई**

जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय रजेवर जाणे, परस्पर रजा वाढवून घेणे अथवा मुख्यालयात अनुपस्थित आढळून येणाऱ्या संबंधित जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांविरुद्ध तात्काळ दुहेरी कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

प्रशासकीय शिस्तभंगाच्या प्रकरणात महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार संबंधित अधिकाऱ्यास तात्काळ निलंबित करून कठोर विभागीय चौकशीची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल. तसेच, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत कर्तव्यात कसूर करणे, आदेशाचे उल्लंघन करणे अथवा आपत्ती निवारण कार्यात बाधा आणणे याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध दंडात्मक तसेच फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात येईल, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

**शेतकरी व ग्रामस्थांच्या अडचणींना संवेदनशीलतेने प्रतिसाद द्या**

दुष्काळग्रस्त शेतकरी व ग्रामस्थांच्या अडचणी संवेदनशीलतेने ऐकून त्यांचा तातडीने निपटारा करावा. कामातील कोणतीही कुचराई, दुर्लक्ष अथवा गैरहजेरी ही आपत्ती व्यवस्थापन कायद्याचा भंग मानली जाईल, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील सर्व जिल्हास्तरीय तसेच क्षेत्रीय विभागप्रमुखांनी या आदेशाची गांभीर्याने नोंद घेऊन तात्काळ व काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड राहुल कर्डिले यांनी परिपत्रकाद्वारे निर्देशित केले आहे.



# अनुसूचित जमाती विकास श्वेतपत्रिकेच्या मागणीसाठी रॅली व धरणे आंदोलन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ सप्टेंबर -**

महाराष्ट्र अनुसूचित जमाती विकासाची श्वेतपत्रिका जाहीर करण्याच्या मागणीसाठी गुरूवार, दि. २४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता महात्मा फुले पुतळा आयटीआय ते जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे रॅली काढण्यात आली. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शांततामय धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व आदिवासी कोळी महादेव समाज मराठवाडा विभागाचे अध्यक्ष नागनाथराव घिसेवाड यांनी केले.

महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींच्या विकासासाठी शासनाने केलेली आर्थिक तरतूद, प्रत्यक्ष खर्च, योजना, लाभार्थी व प्रत्यक्ष लाभ याची अधिकृत माहिती जनतेसमोर यावी आदीसह अन्य मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले.

या रॅली व धरणे आंदोलनात आदिवासी कोळी महादेव समाज मराठवाडा विभागाचे अध्यक्ष नागनाथराव घिसेवाड, व्यंकट मुदिराज, शशिकांत भुसेवाड, ॲड. परमेश्वर गोणारे, केरबा जेठेवाड, गिरीधर मोळके, केशव कुकलवाड, के.पी. सोने, सिद्धेश्वर पिटलेवाडी, केशव जिंकलवाड, रमेश जेठेवाड, आनंदा रेजितवाड, मारोती मामीलवाड, प्रा. भगवान गुंजलवाड, पुंडलिक मोरे, गंगाधर कल्याणकर, डी.एम. भामटे, लक्ष्मी धोरपडे, अर्चना गुंजावळे, ॲड. चंद्रकला जेठेवाड, मुक्ताबाई मनाठकर यांच्यासह नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थी, युवक, महिला, कर्मचारी, शेतकरी आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिव गणेश मित्र मंडळाच्या आरोग्य व रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**इस्लापूर** -श्री शिव गणेश मित्र मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित आरोग्य व रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात तब्बल २२५ नागरिकांनी विविध आरोग्य तपासण्यांचा लाभ घेतला, तर ५५ रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून गरजू रुग्णांसाठी सामाजिक योगदान दिले.



शिबिराचे उद्घाटन इस्लापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश जाधवर यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आले. शिबिरात बालरोग, स्त्रीरोग, नेत्ररोग, अस्थिरोग तसेच कान-नाक-घसा यांसह विविध आरोग्य तपासण्या आणि रक्त तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. या शिबिरात डॉ. ऋषिकेश निकम, डॉ. प्रदीप शिंदे, डॉ. रत्नमाला जानगेवाड, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. शुभम कांबळे यांच्यासह आरोग्यसेवक साईनाथ भुत्तापल्ले, दशरथ डुमपल्लू, रजनीकांत सलाम व सुरेश राठोड यांनी आरोग्यसेवेत योगदान दिले. रक्तदानासाठी ५५ रक्तदाते स्वयंस्फूर्तीने पुढे आले. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याचा श्री शिव गणेश मित्र मंडळाच्या वतीने श्री गणपती बाप्पाची प्रतिमा भेट देऊन सन्मान करण्यात आला. तसेच उपस्थित प्रमुख पाहुण्यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला मंडळाचे अध्यक्ष संतोष डुडेल यांच्यासह डॉ. मोहन गोणेवार, नवीन जैस्वाल, सुदर्शन पाटील, श्याम बैनवाड, राज पोतूलवाड, विकास माहुरकर, गोपाल आंबटवाड, सत्येश्वर पेशवे, साई जाधव, ओम कदम, दिनेश मोमीडवार, राज गोरटे, गजानन गोरटे, संदीप कोसकेवाड, गजानन भाटे, वैभव बदुलवार, अजय अल्लडवार यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. 'सेवेतून उत्सव आणि उत्सवातून समाजहित' हा संदेश देत मंडळाने गणेशोत्सवाला सामाजिक सेवेची जोड दिली. आरोग्य तपासणी व रक्तदानाच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक करण्यात आले. शिबिर यशस्वी करण्यासाठी मंडळाच्या पदाधिकारी, कार्यकर्ते व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## देगलूर महाविद्यालयात माता पालक सहचिंतन सभा

**देगलूर**-माता ही विद्यार्थ्यांची प्रथम गुरू असते विद्यार्थी माता आणि शिक्षक यांचा जर एकत्रित सकारात्मक संवाद झाला तर विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास होण्यास मदत होते असे प्रतिपादन देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ यांनी केले . अ.व्या. शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयात दि.२४ रोजी माता पालक सहचिंतन सभेचे आयोजन करण्यात आले अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. माता आपल्या पाल्यास घरी आल्यानंतर महाविद्यालयातझालेल्या,तासीका , महाविद्यालया मधील उपक्रम याची रोज माहिती घेतली पाहिजे त्यांच्यात सकारात्मक संवाद साधला पाहिजे तर शैक्षणिक प्रगतीस नक्कीच हातभार लागेल.




माता पालक शिक्षक सहचिंतन सभा महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडली प्रारंभी उपप्राचार्य डॉ.एम.एम.चमकुडे यांनी महाविद्यालयात चालणारे शैक्षणिक उपक्रम,अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती याची एकंदरीत माहिती मातापालकांना व्हावी यासाठी माता पालक सहचिंतन सभा आयोजन करण्या मागची भूमिका विषद केली. यानंतर पर्यवेक्षक एस.एन.पाटील आणि उपप्राचार्य डॉ. व्ही.जी शेरीकर यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना अभ्यास करताना घरी माता पालकाचे मार्गदर्शन जसे असते तसेच शिक्षकांचे देखील मार्गदर्शन महाविद्यालयात असते या दोघांच्या समन्वयांमध्ये विद्यार्थ्यांची प्रगती अवलंबून असते.मातानी सध्याच्या काळात विद्यार्थ्यांना मोबाईल पासून दूर ठेवून त्यांना अभ्यासाकडे कसे वळविले जाईल याकडे माता भगिनींनी लक्ष दिले पाहिजे असे विचार व्यक्त केले. यावेळी माता भगिनी सौ.रोहिणी मुळे श्रीमती मोहसीना आणि श्रीमती आसमाशेख या माता पालकांनी महाविद्यालयात चालणाऱ्या अभ्यासक्रमाविषयी इथल्या उपक्रमाविषयी आणि तसेच शैक्षणिक उपक्रमाविषयी माहीती झाली असून महाविद्यालयात अभ्यासक्रम पूर्णपणे शिकविले जाते विद्यार्थ्याकडे लक्ष दिले जाते याबाबतीत काही चिंता नाही असे कौतुकास्पद विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सौ निकिता ऐनलावार यांनी आभार प्रा.सौ.पूजा वाघमारे यांनी मानले.यावेळी उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार संयोजक प्रा. शिवचरण गुरुडे माता पालक विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# श्री शिव जय मल्हार गणेश मंडळाच्या नृत्य स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २४ सप्टेंबर -**

श्री शिव जय मल्हार गणेश मंडळ, अहिल्यानगर धनगर टेकडी, मुदखेड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली भव्य नृत्य स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात व अतिशय सुंदर पद्धतीने संपन्न झाली. या स्पर्धेला मराठवाड्यासह विदर्भ, नागपूर, नाशिक, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, बीड आदी विविध शहरांमधून नामवंत नृत्य कलाकार व स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

स्पर्धेतील विविध नृत्य प्रकारांच्या उत्कृष्ट सादरीकरणामुळे कार्यक्रमाला उपस्थित प्रेक्षकांना दर्जेदार नृत्यकलेचा आनंद घेता आला.




या नृत्य स्पर्धेत नागपूर येथील यास्मिन शेख व अंबाजोगाई प्रिभुषण अकॅडमी ह्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर द्वितीय क्रमांक परभणी येथील आयुष्य अकॅडमी व नक्षत्र सान्वी ह्यांना विभागून देण्यात आला.तृतीय क्रमांक अमरावती येथील सुरज धानोरकर यांना देण्यात आला.

पंच मन्हून लक्ष्मण फुलारी व सागर दास यांनी निरीक्षण केले होते.

या उत्कृष्ट नृत्य सादरीकरणाचे उपस्थित मान्यवर व प्रेक्षकांनी कौतुक केले.

कार्यक्रमास शहरातील अहिल्यानगरचे नगरसेवक उपेंद्र लक्ष्मणराव देवदे, संदीप देविदासराव मोडवान, ऋषिकेश भीमराव पारवेकर, राजू बरतोंडे डॉ पिंटू गुंठे, पिंटू संबोड, रमेश फुले, पांडू कमजळे,प्रशांत फुले, अवधूत देवदे, मंगेश भिंगे, शिवानंद वड्डे, शिवम कमजळे, यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते, मुदखेड शहरातील नागरिक तसेच महिला मंडळाच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

श्री शिव जय मल्हार गणेश मंडळाला राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय पुरस्कार प्राप्त झाले असून, मंडळाच्या वतीने दरवर्षी विविध सामाजिक, सांस्कृतिक व कलात्मक उपक्रमांचे आयोजन केले जाते. याच परंपरेत यंदाची नृत्य स्पर्धाही भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घेतलेली मेहनत, नियोजन आणि परिश्रम यांचे उपस्थितांकडून विशेष कौतुक करण्यात आले. शकडो प्रेक्षकांच्या उपस्थितीत स्पर्धा यशस्वीपणे पार पडल्याने मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या भव्य नृत्य स्पर्धेला प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष स्वरूपात सहकार्य करणारे मान्यवर, नागरिक, महिला मंडळ, स्पर्धक, कलाकार, हितचिंतक आणि सर्व सहकाऱ्यांचे श्री शिव जय मल्हार गणेश मंडळाच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# बोधडी येथील रेल्वे पूल परिसरातील रस्त्याची दयनीय अवस्था

**भा वृतसेवा**
**किनवट, दि. २४ सप्टेंबर -**

बोधडी बु. येथील रेल्वे पूल परिसरातील रस्त्याची सध्या अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, ठिकठिकाणी जीवघेणे पडलेले मोठमोठे खड्डे आणि खड्यात साचलेल्या चिखल-पाण्यामुळे प्रवाशांना प्रचंड हाल सोसावे लागत आहेत. याच ठिकाणी वाटमारीचे प्रकार घडल्याचे वृत्त आहे. म्हणून या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधून रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी बोधडीतील सामाजिक कार्यकर्ते गजानन नरसिंगराव नितुलेवाड यांनी दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड मंडळाच्या मंडल कार्मिक अधिकारी (स.) के.रसना देवी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

बोधडी मंडळातील हजारो नागरिकांचा मार्केटशी दैनंदिन प्रवास असलेल्या बोधडी रेल्वे पूल परिसरातील रस्त्याची दुरवस्था झाली आहे. मोठमोठे खड्डे पडले असून कड्यात पाणी साचत असल्याने वाहनधारकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. यामुळे विशेषतः दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांचे अपघात नित्याचेच झाले आहेत. मात्र पोलीस दप्तरी त्याची नोंद होईलच असे नाही. पावसाळ्यात ही परिस्थिती अधिकच बिकट बनते. तसेच, दीर्घकाळ पाणी साचून राहत असल्याने



डासांचा प्रादुर्भाव वाढून आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची तीव्र भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

या तक्रार अर्जाद्वारे बोधडी बु.येथील रेल्वे पूल परिसरातील रस्त्याची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करावी, रस्त्यावरील खड्डे बुजवून पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी पक्की ड्रेनेज व्यवस्था उभारावी आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी रस्त्याची कायम स्वरूपी दुरुस्ती करण्यात यावी, अशा प्रमुख मागण्या नितुलेवाड यांनी रेल्वे प्रशासनाकडे पाठवलेल्या निवेदनात नमूद केल्या असून केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि किनवट-माहूरचे आमदार भीमराव केराम यांना पुढील आवश्यक कारवाईसाठी निवेदन पाठवले आहे.

# कोठारी - आयप्पा स्वामी मंदिर मार्गावरील अतिक्रमण हटविण्याबाबत जिल्हा प्रशासनाचे निर्देश

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २४ सप्टेंबर -**

सर्वोच्च न्यायालय, दिल्ली तसेच महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार कोठारी ते आयप्पा स्वामी मंदिरापर्यंतच्या राष्ट्रीय महामार्गालगत असलेले अतिक्रमण हटविण्याच्या मागणी संदर्भात नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल व दंडाधिकारी शाखेने किनवटच्या संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

यासंदर्भात माजी बांधकाम सभापती किनवट व्यंकट अण्णा भंडारवार, किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे रा.कॉ अध्यक्ष वैजनाथ करपूडे पाटील, नगरसेवक बाबुराव औदीवार तसेच बाजार समितीचे संचालक अनिल कऱ्हाळे यांनी १५ सप्टेंबर २०२६ रोजी निवेदन सादर केले होते. हे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयास २१ सप्टेंबर २०२६ रोजी प्राप्त झाले. निवेदनामध्ये करण्यात आलेल्या मागणीनुसार कार्यवाही न झाल्यास २ ऑक्टोबर २०२६ रोजी उपविभागीय कार्यालय, किनवट



येथे आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयाने किनवटचे सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना संबंधित निवेदनातील मागण्यांचा विचार करून, त्यासंदर्भातील लागू नियम व अद्ययावत शासनादेश तपासून नियमानुसार तात्काळ उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, उपोषणाच्या विचारापासून अर्जदारांनी माघार घेण्यासाठी करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत अर्जदारांना परस्पर अवगत करावे आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, असेही पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, पत्राच्या प्रती नांदेडचे पोलीस अधीक्षक आणि राष्ट्रीय महामार्ग, नांदेडचे कार्यकारी अभियंता यांनाही आवश्यक कार्यवाहीसाठी देण्यात आल्या आहेत. अर्जदारांच्या तक्रारीचे निवेदन संबंधित विभागाकडे कार्यवाहीसाठी वर्ग करण्यात आले असून, उपोषणाचा मार्ग न अवलंबता संबंधित विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हे पत्र २३ सप्टेंबर २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी (दंडाधिकारी शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आले आहे.

# बिलोली तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करा; काँग्रेसचे तहसील कार्यालयावर आंदोलन

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २४ सप्टेंबर -**

पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिके धोक्यात आली असून शेतकऱ्यांसमोर गंभीर आर्थिक संकट उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर बिलोली तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, या प्रमुख मागणीसाठी बिलोली तालुका काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने तालुकाध्यक्ष प्रा. शिवाजी पाटील पाचपिंपळीकर यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी (दि. २३ सप्टेंबर) तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले.

यावेळी काँग्रेस पदाधिकारी, आजी-माजी नगरसेवक, पंचायत समिती सदस्य, विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित




होते. आंदोलनानंतर नायब तहसीलदार बालाजी मिठेवाड यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात बिलोली तालुका तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करावा, शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रुपयांचे अनुदान तात्काळ मंजूर करावे, १०० टक्के पीकविमा तातडीने मंजूर करून विमा कंपन्यांना आगाऊ नुकसानभरपाई देण्याचे आदेश द्यावेत, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

तसेच पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था करावी, जनावरांच्या चाऱ्याची तातडीने सोय करावी, शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत उपलब्ध करून द्यावी आणि ग्रामीण भागातील लोडशेडिंगचा प्रश्न सोडवून शेतकऱ्यांना २४ तास वीज उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

दरम्यान, यंदाच्या हंगामात पावसाच्या अनिश्चिततेमुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास पावसाअभावी हिरावला जात आहे. प्रशासनाने कागदोपत्री पाहणी न करता प्रत्यक्ष शेतातील परिस्थितीची दखल घेऊन तातडीने मदत जाहीर करावी, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.

आंदोलनात प्रा. शिवाजी पाटील पाचपिंपळीकर, ॲड.भरत पवार, दिलीप पांढरे , शंकर यंकम , प्रा.कमलाकर जाधव, प्रभाकर पेंटे,सविता कांबळे,चेतना जाधव, श्रीनिवास शिंदे, स्वप्नील खंडेराय ,संदीप कटारे,राजू पाटील शिंदे,अमजद चाऊस, वालियोद्दीन फारुकी, शेख नवाब,मुकिंदर कुडके,बंडू जाधव,कुणाल देशमुख, शेख फारुख,सय्यद आयुब,शेख बाबा,सयाराम निदाने यांच्यासह काँग्रेसचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक सहभागी झाले होते.

**शेतकरी हितासाठी आंदोलन तीव्र करण्याचा इशारा**

शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा शेतकरी हितासाठी आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा यावेळी प्रा.शिवाजी पाटील पाचपिंपळीकर यांनी दिला आहे.शेतकरी वाचवा, देश वाचवा अशा घोषणांनी यावेळी तहसील कार्यालयाचा परिसर दणाणून गेला.